● पंढरपूर ● बुधवार, २० नोव्हेंबर २०२४
● किंमत ₹ ४ ● पाने : ८



या दोन्ही दिवशी राहील आठवडा बाजार बंद

PII

# पंढरी संचार

NO PAIDNEWS
pandharisanchar.com
RNI-MAH-MAR/1499/2000
● वर्ष २९ ● अंक - १८०



लेखा जोखा रणांगणाचा !

PIII

## दोन-तीन मतांचा स्विंग बिघडवू शकतो खेळ

# महाराष्ट्रात आज मतदान;

## 73 जागांवर राजकीय पक्षांचे अधिक लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा भाजपप्रणित 'एनडीए' आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालील 'इंडिया' आघाडी (महायुती विरुद्ध महाविकास आघाडी) यांच्यात लढत होत आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात केवळ ०.७ टक्क्यांचा फरक होता. अशा परिस्थितीत विधानसभा निवडणुकीत २ ते ३ टक्के मतांचा स्विंग कोणत्याही महायुती किंवा महाविकास आघाडीचा खेळ करू शकतो. गेल्या पाच वर्षांपूर्वी दहा हजारांपेक्षा कमी मतांनी निवडून आलेल्या ७३ जागांवर राजकीय पक्षांनी अधिक लक्ष्य केंद्रीत केले होते. या जागा तसेच बंडखोर राज्यातील निवडणुकीचे चित्र बदलवू शकतात. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा सत्ताधारी महायुतीवर वरचष्मा होता. महाविकास आघाडीला ३१ तर महायुतीला १७ जागांवर समाधान मानावे लागले. लोकसभा निवडणुकीच्या निकालानुसार महाविकास आघाडी १६० जागांवर, तर महायुती १२८ जागांवर आघाडीवर आहे. महायुती आणि महाविकास आघाडीला मिळालेल्या मतांमध्ये विदर्भात काँग्रेस आणि उत्तर महाराष्ट्रात भाजप पुढे होता. काँग्रेस-उद्धव-शरद पवार जोडीला पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याने साथ दिली. कोकणात शिंदे-भाजपचे वर्चस्व दिसून आले. मुंबईच्या जागांवर दोन्ही आघाड्यांमध्ये तुल्यबळ लढत होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात निवडणुकीचा मार्ग कठीण झाला आहे. या वेळी विधानसभेच्या निवडणुकीत असा एकही मुद्दा नव्हता, की ज्याद्वारे संपूर्ण राज्यातील सर्व विधानसभा जागांवर परिणाम होऊ शकेल. त्यामुळे घोषणाबाजीबाबतही संशय व संभ्रमाची स्थिती आहे. 'बटेंगे तो कटेंगे' आणि 'एक हैं तो सुरक्षित हैं' अशा घोषणा देत भाजपने नॅरेटिव्ह मांडण्याचा प्रयत्न केला; पण 'एनडीए'च्या घटक पक्षांतही त्यावरून कमालीचे मतभेद दिसले. अजित पवारच नव्हे, तर भाजपच्या अनेक नेत्यांनीही ही घोषणा नाकारणार असल्याचे सांगितले. या वेळच्या निवडणुकीच्या रणसंग्रामाचे स्वरूपही बदलले आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात बहुरंगी लढत होत आहे. या पक्षांचे बंडखोर उमेदवारांनी अनेक ठिकाणी निवडणूक महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांची झोप उडवली आहे. अशा स्थितीत कोणाची कोण बाजी मारणार, याबाबत त संभ्रम आहे.

महाराष्ट्रातील एकूण २८८ जागांपैकी सुमारे एक चतुर्थांश विधानसभेच्या जागा सत्तेसाठी टर्निंग पॉइंट ठरू शकतात. गेल्या निवडणुकीत ७३ विधानसभा जागांवर विजय आणि पराभवाचा फरक दहा हजारांपेक्षा कमी होता. अशा परिस्थितीत या ७२ जागांवर काही मते इकडे-तिकडे वळवली तर संपूर्ण खेळच बिघडू शकतो. पाच जागांवर विजय-पराजयाचे अंतर एक हजार मतांपेक्षा कमी होते, तर चार जागांवर विजय-पराजयाचे अंतर एक हजार ते दोन हजार मतांचे होते. २८ जागांवर विजय-पराजय २ हजार ते ५ हजारांचा फरक होता. ३६ जागा अशा होत्या, जिथे पाच ते १० हजार मतांचा फरक होता.

### कमी फरकाने भाजपला सर्वाधिक जागा

● गेल्या निवडणुकीच्या निकालांवर नजर टाकली, तर कमी फरकाने ७३ जागांपैकी २८ जागांवर भाजपने विजय मिळवला. राष्ट्रवादी काँग्रेसने १५, काँग्रेसने १२ आणि शिवसेनेने ५ जागा जिंकल्या. याशिवाय १३ जागा इतर पक्ष आणि अपक्षांनी जिंकल्या.


### At a Glance

### मतदानाला जाताना मोबाईल नेऊ नका!




**सोलापूर :** लोकशाहीचा उत्सव शांततेत व निर्भय वातावरणात पार पडावा, यासाठी मतदानाला जाताना कोणालाही जवळ मोबाईल बाळगता येणार नाही. मोबाईल स्वत: जवळ ठेवून मतदान केले आणि त्यावेळचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला किंवा मोबाईलच्या स्टेट्सवर ठेवल्यास त्या व्यक्तीविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल केला जाणार आहे.

### पैशाच्या देवाण-घेवाणीतून एकाचा खून



**सांगोला :** खवासपूर (ता. सांगोला) येथे डोळ्यात व अंगावर लाल चटणी टाकून डोक्यात रॉडने वार करून डोके फोडून पैशाच्या देवाण-घेवाण कारणावरून किरण ज्ञानेश्वर यादव (वय 38) यांचा खून केल्याची घटना शनिवार, 16 ते रविवार, 17 नोव्हेंबरदरम्यान घडली. संशयित आरोपी अरविंद विष्णू यादव याला पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने 24 नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी दिली आहे.

### डिसले यांना मुंबई उच्च न्यायालयाकडून दिलासा




**बार्शी :** बार्शी तालुका पंचायत समितीचे माजी सभापती अनिल डिसले यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींवर अभिजित अरुण कापसे रा. जवळगाव तालुका बार्शी यांनी बेहिशेबी मालमत्ता गोळा केल्या संदर्भात सोलापूर येथील भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी अर्ज केला होता. त्या अर्जावरून चौकशी अधिकाऱ्यांनी चौकशी करून बार्शी पोलीस स्टेशन येथे वरील आरोपींवरती भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी, डिसले यांना उच्च न्यायालयात अटी व शर्तीसह जामीन मंजूर झाला आहे.

## चार मतदारसंघात प्रशांत परिचारक यांची प्रतिष्ठा पणाला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यात भाजपची ताकद असल्यामुळे भाजपने यंदाच्या विधानसभा निवडणुकीत माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यावर सांगोला, पंढरपूर-मंगळवेढा, मोहोळ, माढा या चार विधानसभा मतदार संघाची जबाबदारी दिली आहे. यामुळे परिचारक यांनी जोमाने प्रचार केला आहे. या चार मतदार संघात परिचारक यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.



पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुतीने भाजप आमदार समाधान आवताडे, सांगोला विधानसभा मतदार संघात दीपक आबा साळुंखे, माढा विधानसभा मतदार संघात मीनल साठे, मोहोळ विधानसभा मतदार संघात यशवंत माने यांना उमेदवारी दिली आहे. हे चारही उमेदवार विजयी करण्याची जबाबदारी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यावर देण्यात आली आहे. पंढरपूर तालुका चार विधानसभा मतदार संघात विभागला गेला आहे. पंढरपूर तालुक्यात परिचारक गटाची ताकद चांगली असल्यामुळे परिचारक गटाची भूमिका निर्णायक ठरणार आहे. परिचारक गटाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी निवडणुकीत जोमाने प्रचार सुरू केला आहे. अनेक राजकीय नेत्यांनी जाहीर सभा घेतल्या आहेत. सभेत आरोप प्रत्यारोप करण्यात आले आहे. निवडणुकीचा प्रचार समाप्त झाला असून आज 20 नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे. अनेक मतदार संघात तिरंगी व चौरंगी लढत होणार आहे. यामुळे कोण विजयी होणार याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे. चारही मतदार संघात परिचारक गटाची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.




### विधवेच्या प्लॉटची परस्पर खरेदी, गुन्हा दाखल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** दुसऱ्याच महिलेला उभे करून विधवेच्या मालकीचा प्लॉट परस्पर खरेदी केल्याप्रकरणी सहा आरोपींना मंगळवारपर्यंत पोलिस कोठडी मिळाली. न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. सरस्वती मसू माने, भय्या बंडू अवघडे, नीता महादेव भालेराव, राजू विठ्ठल खंडाळे, सुनील औदुंबर पाटोळे, शशिकांत दिगंबर आटकळे अशी कोठडी मिळालेल्या आरोपींची नावे आहेत. हर्षदा हेमंत शुक्ल या महिलेचा पंढरपूर नगरपालिका हद्दीतील इसबावीत प्लॉट होता.

### विधानसभा निवडणुकीसाठी 468 एसटीचा वापर ; प्रवाशांची दोन दिवस गैरसोय होणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यातील 11 विधानसभा मतदार संघासाठी निवडणूक घेण्यात येणार आहे. यासाठी मतदान साहित्य व कर्मचारी यांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी 468 एसटी चा वापर करण्यात येणार आहे. यामुळे बस स्थानकात एसटीची संख्या कमी असल्याने प्रवाशांची गैरसोय होणार आहे. जिल्ह्यातील 11 विधानसभा मतदार संघात 20 नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. यासाठी 19 नोव्हेंबर रोजी मतदान साहित्य व कर्मचारी यांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी 468 एस टी चा वापर करण्यात येणार आहे. यानंतर मतदान साहित्य व कर्मचारी यांना पुन्हा पंढरपूर येथे घेऊन येण्यासाठी एसटीचा वापर करण्यात येणार आहे. यामुळे 19 व 20 नोव्हेंबर रोजी बस स्थानकात एसटीची संख्या कमी असल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होणार आहे. प्रशासनाकडून एसटी भाडे देण्यात येणार आहे. यामुळे परिवहन महामंडळाला यातून लाखो रुपयाचे उत्पन्न मिळणार आहे.

### डोळ्यात चटणी टाकून पाठीत वार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूरः** शेतीच्या कारणावरून दोन गटात झालेल्या वादात एकाने पाठीवर धारदार शस्त्राने वार करून जीवे मारण्याची धमकी दिली. याचवेळी डोळ्यात चटणी टाकून लोखंडी रोडने मारहाण करून गंभीर जखमी केले. ही घटना 16 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 वाजता बंकलगी तालुका दक्षिण सोलापूर येथे घडली. याप्रकरणी बिरप्पा धर्मन्ना रुपनुरे (वय 44 रा. बंकलगी, तालुका दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जगदीश रुपनुरे ( वय 35 ), सरुबाई जगदीश रुपनवरे (वय 48), जगदीश अमोगसिद्ध रुपनुरे (वय 55) या तिघांविरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

### ड्रोनव्दारे पंढरपूर शहरावर लक्ष



**पंढरपूर :** पंढरपूर विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून पोलीस प्रशासनामार्फत पंढरपूर शहर व परिसरात ड्रोनद्वारे पाहणी करण्यात येत आहे. मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन पोलीस प्रशासनामार्फत करण्यात आले आहे. वरिष्ठांच्या आदेशान्वये पंढरपूर शहर चे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी संकल्पना राबवली आहे

### आज विठ्ठल रुक्मिणीची प्रक्षाळ पूजा;नित्योपचार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



*__पंढरपूर :__ कार्तिकी यात्रेत आलेल्या लाखो भाविकांना विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन मिळावे म्हणून 24 तास दर्शन खुले ठेवण्यात आले होते. कार्तिकी यात्रा संपली असून आता आज बुधवारी विठ्ठल रुक्मिणीची प्रक्षाळ पूजा करण्यात येणार आहे. यानंतर नित्य उपचारास सुरुवात होणार आहे .*

*प्रक्षाळ पूजेनिमित्त विठ्ठल रुक्मिणी मंदिरात स्वच्छता करण्यात येणार आहे. विठ्ठल रुक्मिणी यांना लिंबू पिठीसाखर लावण्यात येणार आहे. यानंतर अभ्यंग स्नान घालण्यात येणार आहे. विठ्ठलाचे 24 तास दर्शन असल्यामुळे विठ्ठलाच थकवा आला असल्याने आयुर्वेदिक काढा देण्यात येणार आहे. यानंतर नैवेद्य दाखवण्यात येणार असून पोशाख घातल्यानंतर नेहमीप्रमाणे नित्य उपचार करण्यात येणार आहे. प्रक्षाळ पूजेनिमित्य बडवे, उत्पात सेवाधारी यांच्या घरात पुरणपोळीचा नैवेद्य करण्यात येतो. तो विठ्ठलास नैवेद्य दाखवण्यात येतो ही अनेक वर्षाची परंपरा आहे.*




### पंढरपूर-मंगळवेढा मतदार संघात

## ३ लाख ७३ हजार मतदार बजावणार मतदानाचा हक्क

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघासाठी आज बुधवारी सकाळी सात वाजल्यापासून मतदान घेण्यात येणार आहे. या मतदारसंघात ३ लाख 73 हजार मतदार असून यासाठी 357 मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी 3500 कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहेत. मतदानादिवशी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. या मतदारसंघात चौरंगी लढत होणार आहे. यामुळे कोण विजयी होणार याकडे लक्ष लागले आहे.



पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदार संघात महायुती भाजपकडून आमदार समाधान आवताडे, महाविकास आघाडी काँग्रेसकडून भगीरथ भालके, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून अनिल सावंत तर मनसे कडून दिलीप धोत्रे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे या मतदार संघात चौरंगी लढत होणार आहे. गेल्या पंधरा दिवसापासून उमेदवार वाड्यावस्तीवर जाऊन प्रचार करत आहेत. प्रचारा दरम्यान सत्ताधारी व विरोधकाकडून आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. तर अनेक राजकीय घडामोडी घडल्या. या मतदार संघात माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. मात्र भाजपने आमदार समाधान आवताडे यांना उमेदवारी दिली असल्याने परिचारक यांना पक्षाचा आदेश पाडून आमदार समाधान आवताडे यांचा प्रचार करावा लागला. या मतदारसंघात चारही उमेदवारांनी जोमाने प्रचार केला आहे. यामुळे आता आज होणाऱ्या मतदानाकडे लक्ष लागले आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात ३ लाख 73 हजार मतदार असून यासाठी 357 मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी 3500 कर्मचारी तैनात ठेवण्यात आले आहे. संवेदनशील मतदान केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याची करडी नजर ठेवण्यात आली असून पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला आहे. ही निवडणूक अटीतटीची होणार असल्यामुळे कोण विजयी होणार याकडे लक्ष लागले आहे. 23 नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे.

पंढरी संचार

**माढा :** माढा मतदारसंघातील रिटेवाडी उपसासिंचन योजना, बेंद ओढ्यासारखे सर्व प्रलंबित प्रकल्प मार्गी लावू, शेतकऱ्यांच्या विजेची व पाण्यासंदर्भातील कामे मार्गी लावण्यासाठी निवडणुकीनंतर मी स्वतः लक्ष घालून मार्ग काढणार आहे. तुम्ही फक्त महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांना साथ द्यावी, असे जाहीर आवाहन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज येथे केले.

## कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले यांचा आरोप

# महात्मा बसवेश्वर स्मारकाची निर्मिती काँग्रेसमुळेच रखडली

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मंगळवेढा :** बाराव्या शतकात सर्व प्रथम महात्मा बसवेश्वर यांनी लोकशाहीचा पाया रचून अनुभव मंडपाव्दारे म्हणुनच संसदेची निर्मिती केली. मंगळवेढ्यात जगतजोती महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक निर्मितीसाठी कृती समितीने सतत पाठपुरावा केल्यामुळे राज्य सरकारने स्मारक समिती गठीत केली. परंतु काँग्रेसच्या नेत्यांनी विरोध केल्यामुळे ही समिती रदद झाली. त्यामुळे स्मारक निर्मितीचे काम रखडलेले आहे.

मंगळवेढा ही संतांची भूमी असून बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांची कर्मभुमी आहे. महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी सबंध राज्यातुन मागणी होत असताना महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीच्या पुढाकाराने स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले व अॅड. शिवानंद पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे समिती गठीत होण्याकरिता पाठपुरावा केला. समिती गठीत झाल्यानंतर समितीचे कामकाज सुरू होवुन कृष्ण तलाव या जागेचा प्रस्ताव व त्याचा पाठपुरावा चालू असताना व तसा प्रस्ताव प्रांत अधिकारी यांनी प्रस्ताव शासनाकडे पाठविला असताना या विषयाचे कामकाज प्रगतीपथावर असताना सदरची समिती रदद करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे अध्यक्ष आ. नाना पटोले यांनी पत्राव्दारे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र शासन यांच्याकडे केली. त्यानंतर सदरची समिती रदद झाली. स्मारक समिती रदद झाल्यामुळे याबाबत निधीची तरतूद अर्थमंत्री यांना करता आली नाही. वास्तविक महात्मा बसवेश्वरांचे राष्ट्रीय स्मारक मंगळवेढा या ठिकाणी होणार असल्याने एक चांगले पर्यटन केंद्र होवून शहराच्या व तालुक्याच्या विकासात भर पडणार होती. पण काँग्रेसचे नेते आ. नाना पटोले आणि स्थानिक नेत्यांनी विरोध केल्यामुळे समिती रदद झाल्यामुळे हे कार्य पुढे जावु शकले नाही. पंढरपूर-मंगळवेढयाचे आ. समाधान आवताडे यांनी स्मारक कृतीसमितीने त्यांची भेट घेतल्यानंतर वेळोवेळी सकारात्मक भूमीका घेतली व हे काम पूर्णत्वास नेण्यासाठी मदत केली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांना भेटून स्मारकाचे काम तांत्रिक अडचणी दूर करून पूर्णत्वास नेण्यासाठी आवश्यक पाठपुरावा केलेला आहे

याऊलट काँग्रेस पक्षाकडून स्मारक होण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांनी विरोध केल्याचा कांगावा करत आहे आणि महाराष्ट्र शासन हे कार्य करण्यासाठी सक्षम असताना कर्नाटक सरकारकडे मदत मागत आहेत ही शरमेची बाब आहे.

याशिवाय महाराष्ट्रातील महयुती सरकारने महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती करून लिंगायत समाजातील तरूण तरूणींना व्यवसायासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे आणि महात्मा बसवेश्वरांच्या स्मारकाबाबतीत व लिंगायत समाजाच्या प्रश्ना संदर्भात नेहमीच सकारात्मक राहीलेले आहेत. त्यामुळे हा विषय निवडणुकीनंतर गतिमान होणार आहे.

## मतदानासाठी सुट्टी न दिल्यास संबंधित आस्थापनांवर कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** 20 नोव्हेंबर 2024 रोजी विधानसभा निवडणुकीसाठी सर्व आस्थापनांतील अधिकारी, कर्मचारी व कामगारांना भरपगारी सुट्टी किंवा दोन ते तीन तासांची मतदान सवलत देण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. मतदानासाठी सुट्टी न दिल्यास संबंधित आस्थापनांवर कारवाई होईल, अशी माहिती अपर कामगार आयुक्त शैलेंद्र पोळ यांनी दिली. सुट्टीसाठी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक राहील. तक्रारीसाठी दिलेल्या संपर्क क्रमांक व ई-मेलवर alcpune5@gmail.com व dyclpune2021@gmail.com संपर्क साधता येईल. या आदेशांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक आहे.

## शब्द पाळणार नेतृत्व म्हणजे आमदार शिंदे




■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माढा :** सर्वसामान्य नागरिकांना न्याय देऊन गटातटाच्या राजकारणापेक्षा विकासाच्या राजकारणाला प्राधान्य देणारे हे नेतृत्व आहे. त्यामुळेच तरटगाव येथील जाधव पाटील कुटुंब त्यांच्याबरोबर आहे. या कुटुंबाने नेहमीच समाजकारणातून राजकारण करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच आमदार संजयमामा शिंदे यांनी तरटगाव येथील ग्रामस्थ व तालुकावासियांचे मोठे पाठबळ त्यांना मिळालेले आहे. स्व. डॉ. प्रदीपकुमार जाधव पाटील यांनी आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष असताना सर्वसामान्य शेतकरी कामगार यांना न्याय देण्याचे काम केले आहे.

## » Selected

### शरद पवारांच्या डायलॉगची माढा मतदार संघात पोस्टरबाजी



**माढा :** माढा मतदारसंघ हा कायमच चर्चेत असतो. आताही प्रचार संपल्यावर माढा मतदार संघात शरद पवार यांनी शिंदे यांच्या विरोधात दिलेल्या इशाऱ्याचे पोस्टर लागले आहेत. "आता साध सुध नाही, जोरात पाडायचे. " अशा पवारांच्या डायलॉगचे पोस्टर सध्या माढेकरांमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. शरद पवारांनी टेंभुर्णी येथील सभेत शिंदे यांच्या विरोधात वक्तव्य केले होते. याच वक्तव्याचे पोस्टर माढा मतदार संघात सर्वत्र लागले आहे.

### गट-तट विसरून गावच्या विकासासाठी एकत्र या



**सोलापूर :** सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुभाष देशमुख यांच्या प्रचारार्थ दक्षिण सोलापूर मतदारसंघातील भंडारकवठे येथे जाहीर सभेचे आयोजन केले होते. यावेळी देशमुख म्हणाले भंडारकवठे गावासाठी लोकमंगलच्या माध्यमातून गावाला सहकार्य केले. शासनाच्या सर्वात जास्त योजनेचे लाभ गावाला मिळतील यासाठी प्रयत्न केले, सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेतले. त्याचप्रमाणे आदर्श कृषीप्रधान गाव म्हणून भंडारकवठे नावारूपाला येऊद्या, गट-तट विसरून गावाच्या विकासासाठी एकत्र या असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले.

### फडणवीस यांना पोलीस ठाण्यात हेलपाटे मारावे लागतील



**सोलापूर :** विधानसभा निवडणूक झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा बहुतांश वेळ पोलीस ठाण्यात आणि कोर्टात हेलपाटे घालण्यात जाईल, असे वक्तव्य ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी एवढे गुन्हे आणि भ्रष्टाचार करुन ठेवला आहे. या खोट्यानाट्या कामांचा तपास करावा लागणार. त्यामुळे 23 तारखेनंतर देवेंद्र फडणवीस आणि शिंदेंना खुलासे देण्यासाठी पोलीस ठाण्यात हेलपाटे मारावे लागतील.

## मतदान जनजागृती

पंढरी संचार छायाचित्र सेवा




**पंढरपूर :** कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर येथे मतदान जनजागृती,- स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान प्रक्रियेवर आधारित रांगोळी प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, मतदार प्रतिज्ञा ,सायकल रॅली इत्यादी विविध कार्यक्रम घेण्यात आले या मध्ये सुमारे 900 विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

## कवठेकर प्रशाला नाथ चौक येथे मतदान जनजागृती- स्वीप कार्यक्रम संपन्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : कवठेकर प्रशाला नाथ चौक पंढरपूर येथे मतदान जनजागृती,- स्वीप कार्यक्रमांतर्गत मतदान प्रक्रियेवर आधारित रांगोळी प्रदर्शन, चित्रकला प्रदर्शन, मतदार प्रतिज्ञा ,सायकल रॅली इत्यादी विविध कार्यक्रम घेण्यात आले या मध्ये सुमारे 900 विद्यार्थ्यांनी उस्फूर्तपणे सहभाग नोंदवला.कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्रशालेचे मुख्याध्यापक श्री व्ही वाय पाटील यांनी करून मतदान जनजागृती उपक्रमांतर्गत प्रशालेतील घेतलेल्या सर्व कार्यक्रमांची माहिती सांगितली .तद्नंतर सहा. निवडणूक निर्णय अधिकारी पंढरपूर विधानसभा श्री चरण कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना मतदानाचे महत्व व कर्तव्य याची जाणीव करून दिली.व सर्व मान्यवरांचा मुख्याध्यापकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्री चरण कोल्हे यांच्या शुभहस्ते सायकल रॅलीला हिरवा झेंडा दाखवून रॅलीस प्रारंभ झाला. तसेच याप्रसंगी त्यांनी उपस्थित विद्यार्थी व पालक यांना मतदानाचे मतदान प्रक्रियेची थोडक्यात माहिती सांगितली. पंढरपूर तहसील ऑफिस मधील श्री अवसेकर यांनी लोकशाही बळकट करण्याकरिता मतदानाचे महत्त्व स्पष्ट केले. पंढरपूर प्रांत कार्यालयातील सौ बिडकर, व श्री सचिन मिसाळ (स्वीप नोडल अधिकारी अधिकारी पंढरपूर विधानसभा) तसेच श्री प्रकाश शेटे व अनिकेत कुलकर्णी (पंढरपूर सायकलर्स ग्रुप) हे याप्रसंगी उपस्थित होते सर्वांनी प्रशालेतील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

प्रशालेचे मुख्याध्यापक श्री व्ही वाय पाटील सर याप्रसंगी उपमुख्याध्यापक श्री मुंढे सर, पर्यवेक्षक श्री रुपनर सर ज्येष्ठ इंग्रजी विभाग प्रमुख श्री एन जी कुलकर्णी सर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन श्री राजुरकर सर यांनी केले. सर्व उपस्थितांचे आभार श्री गडदे सर यांनी मानले. कार्यक्रमात चे सुत्रसंचालन कु.बिराजदार यांनी केले.सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रशालेतील सर्व शिक्षक बंधु-भगिनी व शिक्षकेतर बंधूंनी परिश्रम घेतले.




## करमाळ्यात केळी संशोधन केंद्र सुरू करणार



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** करमाळा विधानसभा मतदारसंघात निवडणूक रिंगणात उतरलेले अपक्ष उमेदवार आमदार आमदार संजयमामा शिंदे यांनी जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये करमाळा शहराच्या हद्दवाढीसह नवीन विकास आराखडा व शेती, वीज, आरोग्य व शिक्षण य घटकावर भर देण्यात आला आहे. करमाळ्यात केळी संशोधन केंद्र सुरु करणे व कृषी महाविद्यालय सुरु करण्याचा मानस असल्याचे आमदार शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

## निवडणूक प्रक्रियेतील सुलभतेसाठी चक्रीका अॅपचा वापर बंधनकारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** निवडणूक प्रक्रियेत सुलभता आणि कार्यक्षमता वाढण्यासाठी चक्रीका अॅप'चा वापर बंधनकारक असून निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी गुगुल प्ले स्टोअर मधून चक्रीका अॅप डाऊन करावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

चक्रीका अॅप'द्वारे मतदान कर्मचाऱ्यांना मतदारांची तपशीलवार माहिती, मतदान केंद्रांचे निर्देश, आणि प्रक्रियेतील आवश्यक सूचना सहज मिळतात. मतदानाच्या वेळी उद्भवणाऱ्या तांत्रिक समस्यांवर त्वरित तोडगा काढण्यासाठी तसेच मतदानाचे अहवाल पाठविण्यासाठी हे अॅप उपयुक्त असून, निवडणूक नियुक्त अधिकारी कर्मचारी यांनी तात्काळ या अॅपचा वापर करावा असे आवाहनही निवडणूक निर्णय अधिकारी श्री. इथापे यांनी केले आहे.

पाहिजे

हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी
शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास
पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल
लिंक रोड,पंढरपूर
फोन नंबर :- ८२९१३१५०८९




## या दोन्ही दिवशी राहील आठवडा बाजार बंद

# सोलापूर जिल्ह्यातील या गावांचा समावेश : जिल्हाधिकारी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केल्यानुसार सोलापूर जिल्ह्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. सर्व मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदान दि.२० नोव्हेंबर व मतमोजणी दि.२३ नोव्हेंबर या दोन्ही दिवशी सोलापूर जिल्ह्यातील ज्या ठिकाणी आठवडी बाजार भरणार आहे, अशा सर्व ठिकाणी बाजार - पूर्णवेळ बंद ठेवण्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

सोलापूर जिल्ह्यात-
बार्शी तालुक्यातील वैराग,
उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी, नंदुर,
दक्षिण सोलापूर तालुक्यातील - वळसंग, शिंगडगाव, मंद्रुप येथील वडापूर, विंचूर,
अक्कलकोट तालुक्यातील उडगी, चिक्केहळ्ळी, बोरगाव,



सुलेरजवळगे, शावळ, हन्नुर, माढा तालुक्यातील चांदज,
मोहोळ तालुक्यातील पाटकुल, शेटफळ, चिंचोलीकाटी, कोन्हेरी,
करमाळा तालुक्यातील नेरले, जिंती, कंदर, वाशिंबे,
पंढरपूर तालुक्यातील त.शेटफळ, सोनके, सरकोली, जळोली, पटवर्धन कुरोली,बोहाळी, उंबरगांव, पुळूज
माळशिरस तालुक्यातील नातेपुते, महाळुंग, पाणीव तसेच
सांगोला तालुक्यातील मेडशिंगी, किडेबिसरी, नराळे, हंगिरगे,हातीद, कडलास, नवी लोटेवाडी, अजनाळे, भोसे
बार्शी तालुक्यातील बार्शी, घारी, श्रीपत पिंपरी,
उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमन,
दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी, मंद्रुप येथील बरूर, कंदलगाव, औज,
अक्कलकोट तालुक्यातील तोळणूर, जेऊर, कर्जाळ, शिरवळ,
माढा तालुक्यातील मोडनिंब, टाकळी टे,
मोहोळ तालुक्यातील पापरी, देवडी, सय्यद वरवडे, कोन्हेरी,
करमाळा तालुक्यातील केत्तुर,
माळशिरस तालुक्यातील वेळापूर, सांगोला तालुक्यातील आलेगाव, वाटंबरे, मानेगांव, पाचेगांव (खुर्द),
मंगळवेढा तालुक्यातील लवंगी, अरळी, नंदेश्वर, मरवडे.

या ठिकाणचा शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी दिवशी बाजार बंद राहतील. नगरपरिषद, नगरपालिका, व ग्रामीण स्तरावर नगरपंचायत भरणाऱ्या आठवडी बाजाराच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी आदर्श आचारसंहितेचे पालन होण्याचे तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने मार्केट अँड फेअर अॅक्ट अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. २० व २३ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यातील आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

पंढरी संचार

**माढा :** माढा विधानसभा मतदारसंघात अपक्ष उमेदवार रणजितसिंह बबनराव शिंदे यांना पाठिंबा दिल्याच्या कारणावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष गणेश पाटील यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. माढ्यातून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अभिजीत पाटील हे उमेदवार आहेत, त्यानंतरही पाटील यांनी रणजित शिंदे यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे पक्षाने त्यांच्यावर कारवाई केली आहे.

## पंढरपूर विधानसभा मतदार संघामध्ये 357 मतदान केंद्रावर होणार मतदान

# निवडणूक साहित्यासह मतदान अधिकारी कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क



**पंढरपूर :** पंढरपूर विधानसभा मतदार संघातील मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज असून, बुधवार दि.20 नोव्हेंबर 2024 रोजी पंढरपूर विधानसभा मतदार संघातील 357 मतदान केंद्रावर निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. या मतदान प्रक्रियेसाठी 1 हजार 785 मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

पंढरपूर विधानसभा मतदार संघात 1 लाख 91 हजार 464 पुरुष मतदार तर 1 लाख 82 हजार 194 स्त्री मतदार व इतर मतदार 26 असे एकूण 3 लाख 73 हजार 684 मतदार आहेत. तसेच 541 सैनिक मतदार आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर 01 मतदान केंद्राध्यक्ष, 03 मतदान अधिकारी व 01 शिपाई यांची नेमणूक केली आहे. विधानसभा मतदारसंघातील 357 मतदार केंद्रावर प्रत्येकी एक व्हीव्हीपॅट, एक कंट्रोल युनिट, दोन बॅलेट युनिट्स राहणार आहेत व 67 ईव्हीएम मशीन राखीव राहणार आहेत.तसेच विधानसभा मतदारसंघात दिव्यांग कर्मचारी असलेले मतदान केंद्र 01 आणि महिला कर्मचारी असलेले सखी मतदान केंद्र 03 तसेच 06 युवक मतदान केंद्र तयार करण्यात आले आहेत.

पंढरपूर विधानसभा मतदार संघातील 178 मतदान केंद्रावर वेब कास्टिंग होणार आहे. तसेच मतदान प्रक्रीया निर्भयपणे पार पाडण्यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली 602 पोलीस अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये 21 पोलीस अधिकारी तसेच 580 ठाणे अंमलदार व होमगार्ड यांची नियुक्ती केली आहे. मतदान केंद्रांवर विविध सुविधा पुरविण्यात आल्या असून मतदारांना बसण्यासाठी व्यवस्था, शुद्ध व मुबलक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था,सावलीकरिता मंडप व्यवस्था, प्रसाधन गृह, हिरकणी कक्ष, ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांसाठी रॅम्प, व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध राहणारआहे .तसेच वैद्यकीय पथक, सुरक्षा रक्षकही तैनात करण्यात आले आहेत.

पंढरपूर विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर नेऊन सोडणे व निवडणूक मतदान प्रक्रीया पार पाडल्यानंतर परत संबंधीत कर्मचारी यांना आणण्यासाठी 50 बसेस व 17 जीप अशा 67 वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या सर्व वाहनांना जीपीएस यंत्रांना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

पंढरपूर विधानसभा मतदारसंघात 447 मतदारांनी गृह मतदान केले यात 85 वर्षांवरील 409 मतदारांचा तर 38 दिव्यांग मतदारांनी मतदान केले. दि.18 नोव्हेंबर 2024 रोजी पर्यंत विधानसभा निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेल्या 1 हजार 956 अधिकारी कर्मचारी यांनी टपाली मतदान केले आहे. पंढरपूर विधानसभा मतदार संघात दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडत आहे मतदारांनी लोकशाहीच्या या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होऊन आपला हक्क बजवावा व मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे यांनी केले आहे.

## नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदार संघामध्ये बुधवारी 20 नोव्हेंबर रोजी मतदानाची प्रक्रिया होणार आहे. यावेळी जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी मतदान करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आज पत्रकार परिषदेत केले. यावेळी जिल्हाधिकारी म्हणाले मतदान करताना सर्व शासकीय ओळखपत्र तसेच इतर कागदपत्रे ओळखपत्राचा पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार आहेत. तरी नागरिकांनी निश्चितपणे मतदानाचा हक्क बजावावा.

✓ » Selected

## अखिल भारतीय ग्राहक पंचायत व रा.प.पंढरपूर आगारातर्फे मतदार जनजागृती अभियान



**पंढरपूर :** अखिल भारतीय ग्राहक पंचायत व रा.प.पंढरपूर आगार यांचे तर्फे विधानसभा निवडणूक २०२४ साठी मतदार जनजागृती अभियान हा उपक्रम बसस्थानकावर घेण्यात आला. यावेळी आगार प्रमुख अंकुश सरगर, वाहतूक नियंत्रक मोहन शिंदे, ग्राहक पंचायतीचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, व मोठ्या संख्येने प्रवासी उपस्थित होते. यावेळी सर्वांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. तसेच बस स्थानकावर चौकशी कक्ष, आगाऊ तिकीट विक्री विभाग, पेपर विक्री स्टॉल, त्याचबरोबर खाजगी आस्थापना इ.ठिकाणी मतदान जागृतीचे पोस्टर्स लावण्यात आली.

## आमदार समर्थकाला मारहाण, सहा जणांवर गुन्हा दाखल



**माळशिरस :** भारतीय जनता पक्षाचे उमेदवार, आमदार राम सातपुते यांचे 'स्टेट्स मोबाईलमध्ये का ठेवले' अशी विचारणा करत माळशिरस तालुक्याच्या नातेपुते येथील लक्ष्मण मगर यांना मारहाण करण्यात आली आहे. ही मारहाण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरसचे उमेदवार उत्तम जानकर यांचे समर्थक प्रेम देवकाते आणि इतरांनी केली असून पोलिसांनी सहा जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# बार्शीतील तरुण बेपत्ता, कुटुंबाची मदतीची विनंती



**बार्शी :** बार्शी शहरातील नाळे प्लॉट परिसरातील 24 वर्षीय अरबाज रईस बागवान 6 नोव्हेंबर रोजी संध्याकाळी 7 वाजता घरातून काहीही न सांगता निघून गेले आहेत. ते अद्याप घरी परतले नाहीत. कुटुंबीयांनी नागरिकांना मदतीचे आवाहन केले असून, अरबाज यांच्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास 9822515629 या क्रमांकावर संपर्क साधावा. याबाबत पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. पोलीस तपास सुरू आहे, आणि सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अज्ञात वाहनाने धडकेने महिला ठार

**अक्कलकोट :** अक्कलकोट रस्त्यावरील वळसंग टोल नाक्यापासून काही अंतरावर अज्ञात वाहनाने धडक दिल्याने महिला ठार झाली. रंजना खंडप्पा गावडे (वय 42, रा. वळसंग तालुका दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या महिलेचे नाव आहे. गावडे या सायंकाळी 5:45 च्या सुमारास वळसंग गावाकडे पायी जात असताना सोलापूरहून अक्कलकोटकडे जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार ठोकरले. त्यात त्या गंभीर जखमी झाल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

# लेखा जोखा रणांगणाचा !



प्रासंगिक
**बाळासाहेब बडवे**
(संपादक)
मो.नं.7028543453

भारतीय संविधानाने देशातील सर्वच स्तरावरील निवडणूकीच्या बाबत नियमावली (आचारसंहिता) केलेली आहे. महापुरुष असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र विचारातून आणि पवित्र आचारातून अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने जे संविधान लिहिले गेले. त्या संविधानात या आचारसंहितेचा स्पष्ट असा उल्लेख आहे. एकीकडे राजकीय पक्षाच्या व्यासपीठावरुन एकजण म्हणतो, संविधान बदलायचे आहे आणि दुसऱ्याकडून म्हटले जाते संविधान वाचवायचे आहे. कोण खरे बोलतो, कोण कोठे बोलतो, कोण विपर्यास करतो याचे गणित मांडणे हे आचारसंहितेच्या पलिकडची बाब आहे. या आचारसंहितेच्या भंगाबाबतही या नियमावलीत स्पष्ट सुचना (आदेशही) देण्यात आले आहेत. मग हे आदेश जर पाळायचे नसतील तर महाराष्ट्राच्या चालु असलेल्या विधानसभेच्या निवडणुकीच्या रणांगणावर आचारसंहितेची पायमल्ली होताना दिसते. ते या आचारसंहितेचे दुर्दैव आहे का? ज्या हातानी ही आचारसंहिता लिहिली त्या हाताचे हे दुर्दैव आहे का? का राष्ट्र निष्ठेची जपणूक करणाऱ्या मतदारांचे, नागरिकांचे आणि भारताच्या प्रतिष्ठेचे हे दुर्दैव म्हणायचे का?

महाराष्ट्रात मुंबई, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र , कोकण किंबहुना सातपुड्याच्या पायथ्यापासून ते कर्नाटक हद्दीपर्यंतच्या भूप्रदेशावर होत असलेल्या या निवडणूका भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून ते २०२४ च्या २० तारखेला होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीपर्यंत अशा घाणेरड्या निवडणुका, दुषित वातावरणातल्या निवडणुका, सव्यअपसव्याचा होणारा परिणाम बाजूला ठेवून लढल्या जाणाऱ्या निवडणूका, गलिच्छ आरोप, बेछूट आरोप, वैयक्तिक निंदा नालस्ती मग ती नेत्याची असो किंवा उमेदवाराची असो किंवा सर्व पक्षाच्या प्रमुखांची असो यावर घेतले जाणारे तोंडसुख अशा पद्धतीच्या निवडणूका गेल्या ७५ वर्षात कधीही झाल्या नाहीत हे वास्तव मुळीच नाकारता येणार नाही.

१८ तारखेला आचारसंहितेच्या नियमानुसार प्रचार करण्याची मुदत संपली. तरीही रात्रीच्या अंधाराच्या साक्षीने उघड-उघड प्रचाराची रणधुमाळी सुरुच होती. कायदा व्यवस्था निवडणुक आयोगानी नियोजन केल्याप्रमाणे होत असतानाही हा प्रचार कसा होऊ शकतो ? ही सुद्धा आचंब्यात टाकणारी बाब आहे. कधी व्होट जिहाद, कधी जरांगे पॅटर्न, कधी शेतकऱ्यांच्या हमी भावावर अवास्तव होणारी चर्चा याबाबी प्रचारात महत्वाच्या मानल्या जात असताना सर्वच पक्षांनी जाहीर केलेल्या जाहीरनाम्याच्या व्यतिरिक्त जी अवास्तव भाषण बाजी केली ती आचारसंहितेचा भंग करणारी नाही का? छत्रपती शिवाजी महाराज ही महाराष्ट्राची अस्मिता नव्हे तर प्राण आहे. ज्यांनी एका वेगळ्या आत्मविश्वासाने स्वराज्याची स्थापना केली. त्यावेळी फक्त रणांगणावरील शौर्याचा पुरस्कार छत्रपतींनी कृतीत उतरवला आणि रायरेश्वराच्या पिंडीवर आपल्या कंबरेच्या तलवारीने बोटाला फाडून रक्ताचा अभिषेक घातला. हा पर्मपुरुषार्थ, स्वराज्ययाबद्दलची राष्ट्रभक्ती आणि या मातीत रुजलेले पाय कलम करण्यासाठी राष्ट्रहिताच्या स्वाभिमानाने स्वराज्याची स्थापना केली. छत्रपतींनी कुणाला लाच दिली नाही. कुणाचा अपमान केला नाही. कुणाला अंधारातून हजार-पाचशे रुपये दिले नाहीत. जो दंड दिला तो शत्रूला मदत करणाऱ्या नातेवाईकांना. त्या छत्रपती शिवाजी महाराजांचे सगळ्याच व्यासपीठावरुन नेत्यांना नाव घेण्याचा अधिकार कुणी दिला? हे ढोंग आहे का खोटी निष्ठा आहे असा प्रश्न महाराष्ट्राच्या मातीत पाय रोवून बसलेल्या प्रत्येक मतदारांना पडल्याशिवाय राहणार नाही.

आज सकाळपासून (मंगळवारपासून) महाराष्ट्रातील प्रत्येक मतदार संघात (२८८) मतदारांना अमिष दाखविण्यासाठी आपल्या चिन्हावर बटन दाबण्यासाठी लालूच दाखविण्याचे प्रकार घडल्याच्या घटना प्रसार माध्यमातून ऐकायला, पहायला आणि बघायला मिळत होत्या. विरारमध्ये बहुजन विकास आघाडीच्या कार्यकत यांनी भाजपचे केंद्रीय स्तरावर काम करणाऱ्या एका नेत्याला रंगे हात पकडल्याचे प्रसार माध्यमातून सांगण्यात आले. या नेत्यामध्ये असलेल्या डायरीमध्ये मतदारांची किंवा कार्यकत यांची नावे आणि रक्कम होती. दिलीप मस्के नावाच्या एका नेत्यावर मराठवाड्यात प्रचंड हल्ला करण्यात आला. कारण यापेक्षा वेगळे काय असणार? विश्वाचे कल्याण करणाऱ्या श्री पांडुरंगाचे वास्तव्य असलेल्या पंढरी नगरीत सुद्धा मंगळवारी सकाळपासूनच पैसे देऊन मतदारांना आकर्षित करण्याचे प्रकार चारहीही उमेदवारांकडून होत असताना त्यांच्याच मतदारांत चर्चा होत असताना ऐकीवात येत होती. पापाचा नाश करण्यासाठी दर्शनाचा आनंद लुटण्यासाठी जो पांडुरंग उभा आहे. त्यांना जनतेशी नव्हे तर निवडणुक आचारसंहितेशी सर्वच पक्षाकडून होत असलेली गद्दारी बरी वाटणारी आहे ?

हाच प्रकार पुण्यात घडतोय. कोकणात घडतोय. मराठवाड्यात घडतोय. पश्चिम महाराष्ट्रात घडतोय आणि सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या पाड्यात सुद्धा घडतोय. याला बेशिस्त म्हणायची का कायद्याची भीती नाही म्हणायची का स्वार्थाच्या हाताने बरबरटेले कृत्य म्हणायचे का निर्लज्जपणा म्हणायचा. कोणची उपमा, कोणते विशेषण याला म्हणायचे. अभिजात दर्जा प्राप्त झालेल्या मराठी भाषेत याला दुसरा कोणता शब्द आहे? नाशिकमध्ये काय घडलं, नागपूरमध्ये काय घडलं, कोल्हापूरमध्ये काय घडलं ही नामावली कितीतरी वाढत जाणे शक्य आहे. पण यावर कायद्याचा वचक संपलाय असेच म्हणायचे का? पहिला प्रश्न येतो प्रचार यंत्रणेत साधनसुचिता शब्दाची पायमल्ली करुन वापरलेली भाषा. खरे-खोटे आरोप, दुसरीबाब म्हणजे पवित्र हाताने मतदान करणाऱ्या मतदारांची पैसे देऊन केलेली अवहेलना आणि तिसरी बाब म्हणजे कायदा पायदळी तुडवून अवास्तवपणे पक्षीय यंत्रणेचा वापर करणे. याला निर्लज्जपणाशिवाय किंवा सत्तेच्या हव्यासानं विचाराचं विष कालवून निवडणूक लढविणे यापेक्षा वेगळा शब्द प्रयोगच असू शकत नाही.

भारताचे संविधान सर्व धर्मियांचे आदर राखणारे, करणारे आणि प्रत्यक्ष कृतीत उतरविणारे आहे. बहुसंख्य मुस्लिम राष्ट्र जिथे मुस्लिमांची संख्या अधिक आहे. आमच्या नियंत्रण रेषेवर सातत्याने रक्तपात घडविणारा आमचा शत्रू पाकिस्तान जरुर आहे. म्हणून महाराष्ट्राच्या भूमीत राहणारा मुस्लिम आमचा शत्रू कसा असू शकतो? मुंबईतल्या कांही मुस्लिम संघटनांच्या मुस्लिम नेर्तृत्व करणारे मुल्ला-मौलवी किंवा हाफीसाहब आणि मुस्लिम धर्ममार्तंड यांनी जर हिंदुव्देष पेरण्याचा प्रयत्न केला असेल पाकिस्तानी विचाराचा फतवा इथल्यावर मुस्लिमावर लादण्याचा प्रयत्न केला असेल त्यांना योग्य ते शासन दिले गेलेच पाहिजे. पण जे राष्ट्राभिमानी मुस्लिम आहेत त्यांना जातीयवादात अडकवणे मुळीच इष्ट ठरणारे नाही. हिरवा विरुद्ध भगवा या प्रश्नाला उधाण आणण्याचीही गरज नाही.

महाराष्ट्राच्या भूमीवर होणाऱ्या या निवडणूका कायद्याच्या नियमाप्रमाणे कायदेशीर होणे गरजेचे आहे. पण या देशातला कायदा इतका कुणी हालका घेणे हे राष्ट्र हिताचे मुळीच नाही. आज तुम्ही वागला उद्या ते वागतील. सत्तेवर बसणारा प्रत्येक माणूस हा हव्यासी असतो. स्वार्थी असतो. हातानी बरबटलेला असतो. सत्ता आणि संपत्तीचं समीकरण जुळवून या देशातील कायद्याला कुणी पायदळी तुडवणार असेल तर त्याला कठोरातले कठोर शासन होणे गरजेचे आहे. सध्याच्या निवडणुकीचे वातावरण पाहिले तर हे म्हणणे मुळीच अवास्तव मुळीच वाटणार नाही.

या निवडणुकीच्या निमित्ताने महाराष्ट्राने एक वेगळे चित्र पाहिले. सामाजिक फोडाफोडी राजकारणाच्या दृष्टीने मुळीच योग्य नाही. पण त्यापेक्षाही एकत्र कुटुंब उध्वस्त होण्याच्या संकटाने महाराष्ट्रातील अनेक कुटुंबं उध्वस्त झालेली दिसताहेत. बारामतीत पुतण्याविरुद्ध काका लढतोय. खडसे ज्या भूमीत राहतात त्या घरातील सून एकीकडे आणि मुलगी एकीकडे, अक्कलकुवा परिसरात वडील विरुद्ध मुलगी, कुठे वडील विरुद्ध मुलगा तर कुठे पत्नी विरुद्ध पती अशा लढती दुर्दैवाने पहायला मिळतात. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांचे एकमुखी असलेले कुटुंब कुणी शिवसेनेत आहे तर कुणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटातून निवडणूक लढवित आहेत.

राजकारणाच्या हव्यासापोटी पक्ष प्रमुखांच्या प्रोत्साहनांनी महाराष्ट्रातील कित्येक एकत्र कुटुंबं निवडणूकीच्या मैदानात एकमेकाच्या विरुद्ध उभा राहून कौटुंबिक सौख्य हरवून बसलेली दिसतात. यापुर्वी अशी एखादी घटना घडत होती. पण आता नात्यागोत्याचा स्फोट होऊन राजकारणाच्या पायऱ्या चढायच्या आणि उतरायच्या हे गणित मांडताना दिसतात.

महाराष्ट्राच्या या निवडणूकीच्या निमित्ताने ८४ वर्षाचा एक बुजुर्ग नेता उन्हात,तानात, पावसात, थंडीत हजारोंच्या जनसमुदायापुढे आपल्या पक्षाची बाजू मांडून पक्ष मजबूत करण्याच्या इराद्याने प्रकृतीचा मुलाहिजा न बाळगता प्रचार करणारा नेता म्हणजे शरद पवार. शरद पवार यांच्या वयाचा विचार करता त्यांनी कित्येक वर्षाचा अनुभव जमेला धरुन या निवडणूकीचे रिंगण तापवले, गाजवले आणि आपल्या नेर्तृत्वाचे वस्तुपाठ पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या भूमीवर प्रस्थापित केला. महाविकास आघाडीची मजबूत बांधणी करुन मुंबईतल्या आणि महाराष्ट्रातल्या नेत्यांची नाळ दिल्लीतल्या नेत्यांपर्यंत पोहचवून महाविकास आघाडी एकसंघ करण्याची भूमिका प्रामुख्याने जर कुणी घेतली असेल तर ती म्हणजे फक्त फक्त शरदचंद्र पवार यांनी. गेल्या ४०-५० वर्षाचा राजकारणाचा गर्भितार्थ सांगणारा अनुभव, खालेले टप्पे-टोपणे बारामतीच्या आमदारकीपासून ते देशाच्या संरक्षण मंत्रायलयापर्यंत ज्यांनी आपल्या नेतृत्वाची एक वेगळी शैली निर्माण केली. अनेक पक्ष बदलले, कांही पक्ष निर्माण केले. तुटलेल्या पक्षांना जवळ केले. जाहीर सभेत ज्यांनी प्रचंड टिका-टिप्पणी करुन जाहीर अपमान केले. त्यांनीच आपल्या मांडीला मांडी लावून बसण्याची कसब शरद पवार यांना अवगत असल्याने महाविकास आघाडीची मोट बांधणारा हा महारथी महाविकास आघाडीचा किंगमेकर ठरलेले आहेत हे मुळीच नाकारता येणार नाही. मतभिन्नता, व्यक्तीव्देष, सत्तास्पर्धा असू शकतो पण ज्यावेळेस आपली इप्सित साध्य करायचे असते त्यावेळेस शत्रूच्या बगलेत हात घालून मिठी मारायलाही कमी न करणारे शरद पवार यांचे नेतृत्व सत्ताधाऱ्यांचे कर्दनकाळ ठरणारे वाटतात. आपल्या अडीच वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत ज्यांनी महाराष्ट्राच्या विकासाची दृष्टी समोर ठेवून कांही व्यक्तींचे दोषारोप बाजूला ठेवून त्यांना जवळ केले आणि महाराष्ट्राचा गाडा हाकला तो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाने भाजपच्या साथीने आणि पंतप्रधान मोदीजींच्या आशीर्वादाने गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निस्सीम भावनेने, साथीने, सहकाऱ्यांने जी विकासाची गंगा लाडक्या बहिणीपर्यंत पोहोचवली ते एकनाथ शिंदे यांच्या नेर्तृत्वाला सुद्धा दाद द्यावी लागेल. ज्यांच्या तालमीत ते तयार झाले, ज्यांच्या आशीर्वादाने ते रिक्षापासून मंत्रालयातील सहाव्या मजल्यापर्यंत ज्यांच्या आशीर्वादाने मजल मारली ते शिंदे यांचे एकमेव आदर स्थान असलेले शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि ठाण्याचा वाघ आनंद दिघे यांचे मार्गदर्शन शिरोधार्थ माणून राजकारणाचा पुरुषार्थ गाजविला ते एकनाथ शिंदे यांचे कसबसुद्धा महायुतीची संघटन एकसंघ ठेवण्यात कारणीभूत ठरली. हे या निवडणुकीचे वैशिष्टय मानावे लागेल.

महाराष्ट्रातल्या अनेक नेत्यांचा आढावा घेणे इथे गरजेचे नसले तरी भाजपचे चाणाक्ष नीतीचे सरदार उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कसबीचे एकमेव उदाहरण म्हणजे गेल्या अडीच वर्षाची सत्ता केंद्र म्हणावे लागेल. देवेंद्रजी हे रेशीम बागेतील तालमीत तयार झालेले मल्ल असले तरी त्यांच्या तिर्थरुपांपासून त्यांना राजकारणाचा वसा मिळालेला दिसतोय. अचूक व्यक्ती, अचूक नेम आणि अचूक खुर्ची हे देवेंद्र फडणवीस यांच्या विचाराचे गभ्रगृह आहे. संघाची विचारसरणी सामाजिक जीवनाशी एकरुप झालेली आहे. आणि तिथल्या शिक्षणात आणि भाजपच्या सत्ता केंद्रात निश्चीत फरक जाणवतो पण संघाचे विचार आणि राजकारणाची सुत्र याची एकत्र गुंफण करुन धनुष्यबाणाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर बसविणारं फडणवीसांचे हे कसब कौतुकास्पद असंच आहे. पण ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मराठवाड्यातील ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे आणि अजून एक-दोन ज्येष्ठ नेते यांच्याशी मध्यंतरीच्या कालखंडात त्यांचा सुसंवाद तुटला होता.

हे परस्परांच्या भाषण बाजीवरुन दिसून येत होते. पण या आर्य चाणक्यांनी आहेत की नाहीत याची जाणीव कुणालाच येणारच नाही मात्र हे मतभेद गाढून टाकले आणि भाजपाच्या निष्ठेत चाणाक्ष नितीने पुन्हा गुंफून टाकले. उभी हयात भाजपामध्ये घातलेले खडसे संपवून टाकले. पण पंकजाताईंना पुन्हा राजकारणात उभारी मिळवून दिली असे हे कर्तृत्व, संपन्न नेर्तृत्व या निवडणूकीत उमेदवारीचे कसब पणाला लावून आपले कांही नेते दुसऱ्या पक्षाच्या चिन्हावर उभे करुन निवडणूकीचे विश्वास असलेले पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या निवडणूकीच्या रिंगणातून आपसूक बाजूला करुन वेगवान प्रचाराला लावण्यापर्यंत या महाराष्ट्रात जे कसब पणाला लावले त्याचे उत्तर येत्या २३ तारखेला महाराष्ट्राला मिळणार आहे. अजून अनेक बाबी समोर येण्यासारख्या आहेत पण यावर निकालापूर्वीच भाष्य करणे तितकेसे योग्य ठरणार नाही. म्हणून हा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूकीच्या रणांगणावरचा संक्षिप्त लेखा जोखा आहे.

***

# स्वावलंबी महाराष्ट्र कधी?

महिनाभर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू होती. आज मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. राज्यातील ९ कोटी ७० लाख मतदार आपला हक्क बजावणार आहेत. मतदारांचा कौल आपल्याला मिळावा यासाठी उमेदवारांनी आपापले मतदारसंघ पिंजून काढले आहेत. राज्यातील विधानसभा निवडणूक सर्वच राजकीय पक्षांसाठी प्रतिष्ठेची झाली आहे. राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी १५ ऑक्टोबरला आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली होती. सोमवारी सायंकाळी ५ वाजता प्रचाराच्या तोफा थंडावल्या आहेत. उमेदवारांना मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी रविवार हा अखेरचा दिवस होता. रविवारी उमेदवारांनी जाहीरसभा, रॅली काढत प्रचारासाठी चांगलाच घाम काढला. देवेंद्र फडणवीस, स्मृती इराणी, शिवराजसिंह चौहान, अजित पवार, प्रियंका गांधी, प्रफुल्ल पटेल, उद्धव ठाकरे, शरद पवार आदी नेत्यांनी अनेक ठिकाणी जाहीरसभा घेत प्रचाराचा कळस गाठला. रविवारी सकाळीच प्रचाररथ सजले होते. प्रचाररथावर डिजिटल स्क्रीनवर नेत्यांची रेकॉर्डेड भाषणे सुरू होती. पूर्ण दिवस उमेदवारांनी प्रचार करून रविवारचा दिवस सार्थकी लावला. मुख्य पक्षांचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवार प्रचारात आघाडीवर होते. लोकसभा निवडणुकीत घटलेल्या जागा विचारात घेऊन विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने नवीन तंत्र अवलंबून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यावर त्यात अनेकदा दुरुस्ती करण्यात आल्या. पात्र महिलांच्या बँक खात्यावर दीड हजार रुपये जमा केले. महाराष्ट्र सरकारने आणलेली ही काही पहिलीच योजना नाही. याआधीच्या सरकारांनी विविध कल्याणकारी योजना आणल्या, त्या यशस्वीपणे राबवल्या. पण आताच्याएवढा गाजावाजा केला नाही. महायुती सरकारने योजनेच्या प्रसिद्धीवर अमाप पैसा खर्च केला. त्या खर्चाच्या बदल्यात आणखी एखादी योजना झाली असती. जाहिरातींवरचा हा अमाप खर्च पाहून सामान्य नागरिकाला प्रश्न पडला असेल की, राज्यावर काही लाख कोटींचे कर्ज असताना या नव्या योजनेसाठी निधी आणणार कोठून? महिलांना एसटी प्रवासात ५० टक्के सवलत, मोफत गॅस सिलिंडर या योजना महायुती सरकारकडून घोषित करण्यात आल्या, अंमलबजावणी सुरू झाली. महायुती सरकारने आणलेल्या योजना कायदे, नियम तयार करून आणल्या असणार. तरीसुद्धा महायुती सरकार म्हणते, आम्हाला निवडून दिले तरच या योजना सुरू राहतील. म्हणजेच सारे काही संशयास्पद! महाविकास आघाडीने एक पाऊल पुढे टाकून या सर्व योजनांच्या आणि सवलतींच्या योजनांमध्ये वाढ जाहीर केली आहे. महाराष्ट्रात सवलतींचा वर्षाव होतो आहे. हे सारे पाहून मतदारांना प्रश्न पडला असेल की, हाच का आमचा विकास? स्वावलंबी, स्वाभिमानी महाराष्ट्र कधी निर्माण होणार? पंतप्रधानांचे राजकारण विकासाभिमुख असल्याचा उदो उदो निवडणूक प्रचारादरम्यान करण्यात आला. जे. पी. नड्डा यांनी प्रचारादरम्यान पंतप्रधानांची केलेली स्तुती आणि राजकारण याला विकासाची दिलेली जोड जनतेला मान्य नाही. महाराष्ट्रात सत्ता मिळविण्यासाठी बंडखोरी करणाऱ्यांना मूक संमती कोणाची होती? भ्रष्टाचार करणाऱ्यांना सोडणार नाही अशी घोषणा करणारे पंतप्रधान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांच्यावर सिंचन प्रकरणात भ्रष्टाचाराचे आरोप करतात आणि दुसऱ्या दिवशी त्यांना सत्तेत सामावून घेतात, हा कोणता विकास? महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरातला घेऊन जाणे हा कसला विकास? महाराष्ट्रातील कर रूपाने मिळणारा पैसा महाराष्ट्रासाठी खर्च करणे यात कसला आला विकास? महाराष्ट्रातील घाणेरड्या राजकारणाला खतपाणी घालणे याला विकासाभिमुख राजकारण कसे म्हणणार? राज्यात एकीकडे निवडणुकीच्या प्रचाराचा ज्वर वाढत गेला तेव्हा दुसरीकडे भाज्यांचे दरही वाढत गेले. त्याचा सर्वाधिक फटका गृहिणींना बसला. घाऊक बाजारातील भाज्यांच्या किमतीने गगनभरारी घेतल्याने किरकोळ बाजारातील भाज्यांचे दरही गगनाला भिडले. स्वयंपाकाला तिखट आणि मसालेदार चव देणाऱ्या कांदा आणि लसणानेही किमतीचा कळस गाठला. निवडणूक प्रचाराचा ज्वर लवकरच उतरेल पण भाज्यांचे आणि तेलाचे कडाडलेले दर केव्हा उतरतील हा गृहिणींसमोर लाख मोलाचा प्रश्न आहे. पोलिसांचे बल आणि त्यांचे मनोबल वाढविणे गरजेचे बनले आहे. पोलिसांवर खात्याव्यतिरिक्त अन्य जबाबदाऱ्या वाढल्यामुळे पोलिसांची कार्यक्षमता कमी झाली आहे. सरकारच्या बेजबाबदारपणामुळे पोलिस दल भरडले जात आहे. पोलिस यंत्रणा सक्षम नाही. त्यासाठी पोलिस भरती होणे गरजेचे आहे. पावलोपावली पोलिसांची गरज भासत असताना त्यांची कदर होताना दिसत नाही. त्यांना मिळणाऱ्या सुविधांबाबत अनास्था आहे. मानसिक ताणामुळे स्वास्थ्य आणि समाधान नसल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत आहे. पोलिसांचे बल आणि मनोबल वाढल्यास त्यांची कार्यक्षमता वाढून गुन्हेगारी रोखण्यास तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यास पोलिस यंत्रणेला यश मिळेल. राजकारणात घराणेशाही माजल्याचे वारंवार म्हटले जाते. खरे पाहता सत्ता ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. सर्वसामान्य कुटुंबातील लोकप्रतिनिधी निवडून आले पाहिजेत. सत्ता ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे हा विचारच कधी कुणाला शिवताना दिसून येत नाही. एकदा का राजकारणात प्रवेश केल्यानंतर राजकारण्यांच्या संपत्तीत झपाट्याने होणारी वाढ हा संशोधनाचा विषय आहे. राजकारणाचे क्षेत्र आता पूर्वीसारखे पवित्र राहिले नाही. राजकारणात आपले प्रस्थ टिकविण्यासाठी कोणताही मार्ग अवलंबिण्यात येतो. अर्थात ही मुजोरी येते ती आर्थिक संपादनातून. प्रत्येक दिवसागणिक कितीतरी पटीने राजकारण्यांची संपत्ती वाढत जाते. ही संपत्ती येते कुठून आणि कोणत्या मार्गाने याची कधी चौकशी होत नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाला सादर केल्या जाणाऱ्या उमेदवाराच्या शपथपत्राला काही अर्थ उरत नाही. देशभरातील लाखो राजकारणी गैरमार्गाने संपत्ती कमावून राजकारणातील आपले स्थान टिकवून ठेवतात. एखाद्यावर कारवाई होते ती राजकारणातील शह-काटशहातून! राजकारण्यांच्या संपत्तीत शेकडो पटीने वाढ होते कशी असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने उपस्थित केला आहे. त्यामुळे राजकारणातील भ्रष्टाचारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**आपण या भारत देशाचे नागरीक आहोत, हा भारत देश लोकशाही आहे, ती देशाची लोकशाही आपल्या राज्यघटनेनं बळकट केलेली आहे, तेव्हा प्रत्येक भारतीयाचं आद्य कर्तव्य आहे की, मतदान केलंच पाहिजे. निवडणुकीची वस्तुस्थिती ही आहे की, प्रत्येक मताला किंमत आहे आणि मोल आहे. निवडणुकीच्या भाषेत सांगायचं झालं तर काही निवडणुकांमध्ये केवळ ८ मतांनी उमेदवार निवडून आलेला आहे. अगदी यावेळच्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये मुंबईतील एक उमेदवार ४८ मतांच्या फरकांनी निवडून आला आहे. मतदारांना जर वाटत असेल की, सगळेच पक्ष वाईट आहेत, सगळेच उमेदवार भ्रष्ट आहेत तर मतदानकेंद्रात जा आणि 'नोटा'चे बटण दाबा. कारण तुमच्या घरी बसण्यामुळं दुसरा कुणी उमेदवार निवडून यायला मदत होते.**

# मतदानाचं मोल ओळखा!

लोकशाहीबद्दल एक म्हटलं तर मुळात अर्थपूर्ण, प्रेरणादायी वाक्य आहे; पण म्हटलं तर ते भीतीदायकही आहे. ते म्हणजे, इन डेमोक्रसी, पीपल गेट द गव्हर्नमेंट दॅट दे डिझर्व्ह. लोकशाहीमध्ये लोकांना त्यांच्या लायकीप्रमाणे सरकार मिळतं. हे लोकशाहीचं फार मार्मिक आणि नेमकं वर्णन आहे. ते प्रेरणादायी आहे असं म्हणण्यामागचं कारण आपण मतदार ठरवतो की सरकार कोणतं असावं. पण लोकप्रतिनिधी जर निवडून आल्यावर लोकांच्या कल्याणाऐवजी स्वतःच्या कल्याणातच गुंतून जात असतील, त्यांच्या हवेल्या उभ्या करत असतील, दोन नंबर मार्गानं माया जमवत असतील तर त्याची अंतिमतः जबाबदारीही लोकांवर येतच असते. त्याअर्थानं हे वाक्य भीतीदायक आहे. पण वर्णन बरोबर आहे. कारण लोकशाही म्हणजे लोकांनी निवडलेलं शासन. आजघडीला भारतीय मतदारांची संख्या ९० कोटींहून अधिक आहे. त्यानुसार निवडून आलेल्या सरकारबाबत अल्प प्रमाणात का होईना पण कुठे तरी जबाबदार आहे. मतदान केलं असेल तरी जबाबदार आहे आणि नसेल तर जास्त जबाबदार आहे. कारण त्यानं लोकशाहीतला पवित्र हक्क बजावलेला नाहीये. साधारण असं दिसून येतं की, स्वातंत्र्यानंतर झालेल्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये सरासरी पाच उमेदवार असतात आणि सरासरी मतदानाचं प्रमाण पडतं ५५ टक्के. याचाच दुसरा अर्थ १२ मतं मिळवून निवडणूक जिंकता येणं शक्य आहे. त्यामुळं आपलं प्रत्येक मत अनमोल आहे, हे मतदारांनी लक्षात ठेवायला हवं.

आपण या भारत देशाचे नागरीक आहोत, हा भारत देश लोकशाही आहे, ती देशाची लोकशाही आपल्या राज्यघटनेनं बळकट केलेली आहे, तेव्हा प्रत्येक भारतीयाचं आद्य कर्तव्य आहे की, मतदान केलंच पाहिजे. आपल्या राज्यघटनेमध्ये मतदान हा नागरिकांचा अधिकार आहे. घटनात्मक दृष्ट्या तो मुलभूत अधिकारात नाहीये. तो 'लीगल राईट' आहे. संविधानाच्या आर्टिकल ५१ (अ) मध्ये नागरिकांच्या मुलभूत कर्तव्यांचा (फंडामेंटल ड्युटीज) उल्लेख आहे. पण त्यामध्ये मतदानाचा उल्लेख नाहीये. तो पुढं आहे. असं असलं तरी भारत देशाचा नागरीक या नात्यानं मतदान हे केलंच पाहिजे. माझ्या मते, मतदान न करणं हा एक 'नैतिक गुन्हा' आहे. एकीकडं मतदान करायचं नाही आणि उरलेला सर्व काळ शंख करत राहायचं की, सरकार कसं वाईट आहे, सरकार कसं चूक आहे, राजकारण कसं वाईट आहे, हे पूर्णतः चुकीचं आहे. मतदानाचा दिवस हा सुट्टीचा दिवस नसून तो लोकशाहीतलं परमकर्तव्य बजावण्याचा आहे. अनेक जणांना असं वाटतं की, माझ्या एका मतानं काय फरक पडणार आहे; पण एकट्यानं का दुकट्यानं हा प्रश्नच नाहीये, तू जाऊन तुझं काम करायचं. बस्स!

निवडणुकीची वस्तुस्थिती ही आहे की, प्रत्येक मताला किंमत आहे आणि मोल आहे. निवडणुकीच्या भाषेत सांगायचं झालं तर काही निवडणुकांमध्ये केवळ ८ मतांनी उमेदवार निवडून आलेला आहे. अगदी यावेळच्या लोकसभेच्या निवडणुकांमध्ये मुंबईतील एक उमेदवार ४८ मतांच्या फरकांनी निवडून आला आहे. मला आठवत राहतं, मागे एकदा विधानसभेच्या निवडणुकीला मनोहर जोशी सर दादर मतदारसंघातून युतीच्या तिकिटावर उभे होते. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे होते आणि भाजप-शिवसेना युती होती. दादर मतदारसंघ हा शिवसेनेचा, मराठी माणसांचा बालेकिल्ला. त्यामुळं अनेक मराठी मतदारांनी विचार केला की, काहीही झालं तरी मनोहर जोशी सर निवडून येणारच आहेत, मी जातो सुट्टीवर. पण यामुळं घडलं मोठं विचित्र. मनोहर जोशी सर ती निवडणूक हारले. त्यामुळं ज्यांना कुणाला असं वाटतं की माझ्या एकट्याच्या मतानं काय होणार आहे, ते वाटणं चूक आहे. तुमचं एक मत बदल घडवू शकतं. थेंबे थेंबे तळे साचे हे जे शहाणपण आहे ते मतदानाच्या प्रक्रियेला चपखल लागू आहे.

मतदानाची टक्केवारी कमी होत जाणं याचा एक अर्थ असा होतो की, लोकशाही, राजकीय व्यवस्था याविषयीचा लोकांच्या मनातील भरवसा कमी झालाय. एक प्रकारची जी उदासिनता येते किंवा त्याहून बोचरा शब्द आहे तुच्छता निर्माण होते, त्यामुळं मतदानाचा टक्का घसरतो. जणू सगळेच चोर आहेत, सगळेच भ्रष्ट आहेत, निवडणुकांमध्ये प्रचंड पैसा वाहतोय, तोही दोन नंबरचा, शिवाय मसल पॉवर, गुंडागर्दी, झुंडशाही... या सर्वांमुळे नागरिकांच्या मनामध्ये या प्रक्रियेविषयीच्या विश्वासार्हतेला धक्का लागतो. मतदानाच्या कमी प्रमाणामागं हे फार महत्त्वाचं कारण आहे.

मतपत्रिकेवर मतदाराला 'नन ऑफ दी अबाव्ह' अर्थात नोटा' हा पर्याय दिला पाहिजे, याबाबत आग्रही मागणी करणारे भारतात जे कुणी होते त्यामध्ये मी होतो. मतदारांना जर वाटत असेल की, सगळेच पक्ष वाईट आहेत, सगळेच उमेदवार भ्रष्ट आहेत

**अविनाश धर्माधिकारी,**
माजी सनदी अधिकारी

तर मतदानकेंद्रात जा आणि 'नोटा'चे बटण दाबा. कारण तुमच्या घरी बसण्यामुळं दुसरा कुणी उमेदवार निवडून यायला मदत होते. म्हणून निदान 'नोटा'ला जरी मतदान केलं तरी मग नागरीक राजकीय व्यवस्थेविषयीचा आपला अविश्वास मतपत्रिकेद्वारा म्हणजे शांततामय मार्गाने राजकीय व्यवस्थेपर्यंत पोहोचता करतात. त्यामुळं मतदान हे केलंच पाहिजे. यासाठी मतदानजागृतीच्या मोहिमा या सातत्यानं केल्याच पाहिजेत.

आतापर्यंत दिसून आलेलं वास्तव असं आहे की, मतदान कमी करण्याचं सगळ्यात जास्त प्रमाण शहरी आणि सुशिक्षित मतदारांत आहे. ही खरं तर आपल्या लोकशाहीतील उलटी आणि विचित्र परिस्थिती आहे. स्वतःला जो सुशिक्षित म्हणवतो त्यानं तर न सांगता मतदान करायला हवं. पण हा सुशिक्षित मध्यमवर्ग मतदानादिवशी कधी घरी बसतो, कधी सुट्टीची संधी साधून फिरायला जातो, ही बाब चुकीची आहे. त्याच्याच मनात राजकीय व्यवस्थेविषयी दुरावा असता कामा नये. तेव्हा मध्यमवर्गानंही ही सर्व मरगळ, काजळी झटकून देऊन मतदानाला उतरलं पाहिजे.

भारतीय लोकशाहीत अनेक वेळा दिसून आलं आहे की, मुस्लिम समाज एकगठ्ठा मतदान करतात, स्ट्रॅटेजिक व्होटिंग करतात. प्रत्येक वेळीच करतात असं नाही; पण व्यापक राजकीय वस्तुस्थिती पाहिल्यास मुस्लिम मतांकडे 'व्होट ब्लॉक' म्हणून पाहिलं जातं. एकगठ्ठा मतदान. वेळोवेळीचा अभ्यास हे दाखवून देतात. या स्ट्रॅटेजिक व्होटिंगला त्यांनीच दिलेलं नाव 'व्होट जिहाद' असं आहे. हा लोकशाहीला धोका आहे. पण त्याला उत्तर द्यायचं असेल तर जागृत नागरिकांनीसुद्धा आपला मतदानाचा हक्क उघड्या डोळ्यांनी नीट बजावला पाहिजे.

दुसरे दुर्दैव म्हणजे, केवळ संकुचित स्वार्थापायी अनेकांनी महाराष्ट्राला जातीय लाईन्सवर तोडून ठेवलंय आणि त्या जातींकडं ते एकगठ्ठा मतदान म्हणून पहाताहेत. माझ्या मते हे लोकशाहीतलं पाप आहे. राजकीय पक्षांनी जातींना जोडण्याची भूमिका ठेवणं आवश्यक आहे. त्याऐवजी मी एका जातीला दुसऱ्या जातीविरुद्ध पेटवलं किंवा द्वेष निर्माण केला तर या मतदारसंघातील या विशिष्ट जातीची मतं मला मिळतील आणि मला निवडणूक जिंकण्यास पुरेशी आहेत, हा विचारच अत्यंत नकारात्मक परिणाम करणारा आहे आणि फार मोठं पाप आहे. मुळात महाराष्ट्राचं काम सगळ्या देशाला दिशा देण्याचं आहे. त्याऐवजी हा महाराष्ट्रच सामाजिक फाटाफुटीनं दुभंगू लागलाय आणि ही सामाजिक फाटाफूट आता राजकारणात व्यक्त होतीय. आताच्या विधानसभेतलं महाराष्ट्राचं चित्र तर प्रचंड फाटाफुटीचं बनलं आहे. महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असं चित्र नाहीये. महाविकास आघाडीमध्ये फाटाफूट आहे. त्यांच्या प्रत्येक मतदारसंघात बंडखोरी आहे. महायुतीमध्येही फाटाफूट आहे. महाराष्ट्राचं राजकीय चित्र पाहिलं तरी काँग्रेसमधून फाटाफूट होऊन राष्ट्रवादी काँग्रेस तयार झाला. आता त्यात शरद पवार गट आणि अजित पवार गट अशी फाटाफूट झाली आहे. शिवसेनेतून बाहेर पडून मनसेची स्थापना झाली. आता एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे गट यामध्ये शिवसेना विभागली गेली आहे. त्यावरुन आताच्या विधानसभेचं गणित काढलं तर महाराष्ट्रातील मतदारसंघातील लढती या सहा किंवा सात कोनी बनल्या आहेत. याचा अर्थ एका विशिष्ट उमेदवाराच्या पाठिशी विशिष्ट एकगठ्ठा मतं असतील तर तो कमी मतांवरही निवडून येणार. हे चित्र राज्याच्या हिताचं नाही. यालाही उत्तर अंतिमतः तेच आहे की, मोठ्या संख्येनं मतदारांनी मतदानासाठी बाहेर उतरलं पाहिजे आणि आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे.

व्यापक अर्थानं मतदानाचे प्रमाण वाढवण्याच्या विषयाचा विचार करताना दोन मुद्दे प्रामुख्यानं मांडले जातात. त्यापैकी एक म्हणजे ऑनलाईन व्होटिंग. तत्वतः हा मुद्दा योग्य आहे. पण याला धोका आहे तो हॅकिंगचा. आज ईव्हीएमचंच उदाहरण घेतल्यास त्याबाबत सोयीस्कररित्या शंका घेतल्या जातात. त्या निरर्थक आहेत आणि न्यायालयातही हे सिद्ध झालं आहे. पण तरीही आपण निवडणूक जिंकलो की ईव्हीएम निर्दोष आणि हारलो की ईव्हीएम दोषी असा त्या मतदानयंत्रांचा खेळ झाला आहे. हे लक्षात घेता ई-व्होटिंगच्या दिशेनं जाताना हॅकिंगविषयीच्या शंका दूर करून जनतेच्या मनात विश्वास निर्माण करावा लागेल. आज भारतातच नव्हे जगात मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार डिजिटल माध्यमातून होतात. त्याला ब्लॉकचेन व्यवस्था आहे. पासवर्डची, डिजिटल सिग्नेचर, ओटीपीची व्यवस्था आहे. पण तरीही त्यांच्यापुढे प्रश्नचिन्हे आहे. त्यामुळं मुख्य मुद्दा की कायद्यानं मतदान सक्तीचं केलं पाहिजे. मी पूर्वीपासून हे मत मांडत आलो आहे. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी मतदानसक्तीचा कायदा संमत केला होता. पण राज्यांच्या कायद्यांना केंद्राची मान्यता लागते. तत्कालीन केंद्र सरकारने त्याला मान्यता दिली नाही. पुढे सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण गेले तेव्हा मतदान हा नागरिकांचा अधिकार आहे, तुम्ही त्यांच्यावर सक्ती करु शकत नाही असा दृष्टिकोन न्यायालयाने ठेवला. मी त्याच्याशी सहमत नाहीये. जगातील काही देशांप्रमाणे विशेषतः ऑस्ट्रेलियासारख्या देशाप्रमाणे भारतातही मतदानसक्ती केली पाहिजे. पण प्रश्न एवढाच आहे की, एकदा सक्तीचं केलं तर सरकार आणि निवडणूक आयोगावर जबाबदारी येऊन पडते की प्रत्येक मतदाराला मतदान करता आलं पाहिजे. प्रशासकीय व्यवस्था उभ्या करुन ही सक्ती करायला हवी. यंदाच्या वेळी लोकसभा निवडणुकांमध्ये अतिवयोवृद्ध व्यक्तींचं मत घरात जाऊन नोंदवण्याचा प्रयोग निवडणूक आयोगानं यशस्वीपणानं राबवला. हे पाऊल स्वागतार्ह आहे. अनिवासी भारतीयांनाही आपला मतदानाचा हक्क बजावता येईल अशी व्यवस्था आहे. अशा प्रयत्नांनी मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल. पण शासन आणि आयोगावर जबाबदारी ढकलण्यापेक्षा देशाचा नागरीक म्हणून मतदानाचा हक्क बजावण्याचं शहाणपण प्रत्येक मतदारांनी दाखवणं अधिक महत्त्वाचं आणि लोकशाही सदृढ करण्यासाठी गरजेचं आहे.

**(शब्दांकन : हेमचंद्र फडके)**




**पंचांग**

बुधवार, दिनांक २० नोव्हेंबर २०२४
कार्तिक कृ. ५, पुनर्वसु, श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१, अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू शुभ दिवस
नक्षत्र : पुनर्वसु, योग : शुभ, करण : गरज
**सूर्योदय :** स.०६.२९ **सूर्यास्त :** सायं. ०५.२९ वा.
**राहू काळ :** दुपारी : १२:०० ते १:३०

**दिनविशेष**

▶१७५०: म्हैसूरचा वाघ टिपू सुलतान याचा जन्मदिन. ▶१८५९: मौंट स्ट्युरअट एल्फिन्स्ट या मुंबई प्रांताच्या राज्यपालाचे निधन. त्याने मराठीतून विज्ञान शिक्षणाला प्रोत्साहन देण्याऱ्या अनेक योजना सुरू केल्या. ▶१८७७: एडिसनने पहिल्या ग्रामोफोनचा प्रयोग जाहिररीत्या केला. ▶१९०५: मिनू मसानी या संसदपटूचा जन्म. स्वतंत्र पक्षातर्फे ते संसदेत निवडून गेले होते. ▶१९०८: बंगाली क्रांतीकारक कन्हैयालाल दत्त यांनी फाशी. ▶१९२७: न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांचा जन्म. सर्च, मणिभवन, सर्वोद्य आश्रम (नागपूर) स्त्री आधार केंद्र (पूणे) अशा अनेक संस्थांचे ते मार्गदर्शक आहेत. ▶१९५१: काश्मीरला भारतीय घटना लागू. ▶१९७३: केशव सीताराम 'प्रबोधनकार' ठाकरे यांचे निधन. ▶१९९७: अखिल भारतीय हिंदू महासभेचे माजी अध्यक्ष शांताराम शिवराम ऊर्फ आचार्य बाळाराव सावरकर यांचे निधन. बाळाराव सावरकरांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कार्यकर्तव्य, समग्र वाङमय प्रसिद्ध करून मोठे कार्य केले. ▶१९९७: कल्पना चावला या पहिल्या भारतीय वंशाच्या महिलेचे अवकाशयानातून प्रयाण. ▶१९९८: रशियाने झार्याचे प्रक्षेपण केले.

**राशीभविष्य**

▲ **मेष** : अवघड कामे मार्गी लागतील. ▲ **वृषभ** : संयम बाळगा. ▲ **मिथुन**: आत्मविश्वास वाढेल. ▲ **कर्क** : टोकाचे निर्णय टाळा. ▲ **सिंह** : कामातून धनलाभ होईल. ▲ **कन्या** : आरोग्य सांभाळा. ▲ **तुळ** : परमार्थातून मन:स्वाथ लाभेल. ▲ **वृश्चिक** : काबाडकष्ट घ्यावे लागतील. ▲ **धनु** : धार्मिक कार्य घडेल. ▲ **मकर** : खर्चाला अनेक फाटे फुटतील. ▲ **कुंभ** : प्रसंगी कठीण निर्णय घ्यावे लागतील. ▲ **मीन** : मनोबल वाढेल.

**चिंतन**

जीवन व्यवहारात विवेक बुद्धीचे पदोपदी प्रतारणा करणे, कुठल्या तरी अभिनिवेशाच्या आहारी जाणे, व्यावसायिक नैपुण्याविषयी उदासिन राहणे, जाती व धर्म, स्त्री व पुरुष असले कृत्रीम, अनैसर्गिक व अक्षम्य भेद निर्माण करणे, अशा प्रवृत्तीमुळेच आपले अध:पतन घडले. – **न्यायमूर्ती रानडे**

**व्यक्तीविशेष**

## सीताराम ठाकरे

**'प्रबोधनकार' म्हणून महाराष्ट्राला परिचित** असणाऱ्या वादळी व्यक्तिमत्वाचा आज स्मृतीदिन. दि. १७ सप्टेंबर १८८५ रोजी केशव सीताराम ठाकरे यांचा जन्म झाला. घणाघाती शैलीत लिहिणारा खंदा पत्रकार, समाजसुधारक, वक्ता, इतिहासकार अशा अनेक नात्यांनी त्यांची मुद्रा मराठी जनमानसावर ठसली आहे. अस्पृश्यता निवारण, हुंडाविरोधी यासारख्या सामाजिक सुधारणांसाठी त्यांनी आपली लेखणी झिजवली. सारथी, लोकहितवादी, प्रबोधन यासारखी नियतकालिके चालवली. सामाजिक आणि धार्मिक गुलामगिरीचा नायनाट करण्यासाठी काढलेल्या 'प्रबोधन'मुळेच ते 'प्रबोधनकार' झाले. 'कुमारिकांचे शाप', 'प्रतापसिंह छत्रपती आणि रंगो बापूजी', 'हिंदवी स्वराज्याचा खून', 'कोदंडाचा टणत्कार' इ. पुस्तके लिहिणाऱ्या प्रबोधनकारांनी आपली जीवनकथा 'माझी जीवनगाथा' मधून सांगितली आहे.

**बोधकथा**

## अंगी नम्रता असावी

जयंत नावाचा एक श्रीमंत तरुण आपल्या घोड्यावर स्वार होऊन गावाकडे निघाला होता. त्या काळात वाहने फारशी नव्हती. शिवाय पक्के रस्तेही नव्हते. त्यामुळे तो जमेल तसे मजल, दरमजल करत गावाच्या दिशेने निघाला होता. एकदा प्रवास करता करता रात्र झाली. त्या वेळी जयंतने एका गावाजवळ मुक्काम करण्याचे ठरवले. तेथे एक छोटेसे हॉटेलवजा ठिकाण होते. तेथे राहण्याची सोय असल्यामुळे जयंत तेथे उतरला. तेथील मालकाने जयंतसाठी उत्तम भोजन बनवले. इतकेच नाही तर तुम्ही कुठून आलात, कुठे जायचे आहे, रस्त्याची अवस्था कशी आहे, कोणकोणती माणसे भेटली, असे मूलभूत प्रश्न विचारले. मात्र जयंत आपल्याच गुर्मीत होता. मालकाने विचारलेल्या प्रश्नाची उत्तरे देणं त्याला फारसं महत्त्वाचं वाटलं नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून जयंत आपल्या पुढच्या प्रवासाला निघाला. त्यावेळी मालकाने जयंतला न राहून पुन्हा विचारले, 'तुम्ही कोणत्या रस्त्याने जाणार आहात ?' आपल्याला सर्व काही माहीत आहे, अशा आवेशात येऊन जयंत काहीसा रागातच म्हणाला, 'तुमचे पैसे मी तुम्हाला दिले आहे ना,

(पूर्वार्ध)

**जिज्ञासा**

## जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ

भारतातील जगप्रसिद्ध शास्त्रज्ञांमध्ये डॉ. जयंत नारळीकर यांचे नाव आवर्जून घ्यावे लागेल. १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे त्यांचा जन्म झाला. गणित या विषयाचा वारसा त्यांना वडीलांकडून आला. त्यांचे वडील बनारस हिंदू विश्वविद्यालयात गणित विषयाचे प्राध्यापक आणि विभागप्रमुख होते. तर त्यांची आई संस्कृत विषयाची अभ्यासक होती. जयंत नारळीकर यांचे शाळेचे शिक्षण बनारस येथेच झाले. तेथील फिटझ बिल्यम कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन १९६० मध्ये त्यांनी केंब्रीज विद्यापीठाची गणीतातील पदवी घेतली. पुढे पीएचडी करून एमए आणि डॉक्टर ऑफ सायन्स या पदव्या देखील त्यांनी संपादन केल्या. इन्स्टिट्यूट ऑफ थिऑरिटिकल अॅस्ट्रानॉमी या संस्थेच्या स्थापनेत त्यांचा मोठा सहभाग होता. तेथे त्यांनी फ्रेड हॉईल यांच्यासह खगोलशास्त्रात संशोधन केले. गुरूत्वाकर्षणाशी संबंधीत असलेला हॉइल-नारळीकर सिद्धांत जगप्रसिध्द आहे. डॉ. नारळीकर १९७२ मध्ये भारतात परत येऊन पुन्हा संशोधनास लागले.

(पूर्वार्ध)

**सामान्यज्ञान**

## परिणाम भरती-ओहोटीचे

शास्त्रज्ञांना तापमानातील बदलाचे १५०० ते १८०० वर्षे आवर्तनाचे चक्र लक्षात आले आहे. नैसर्गिक कारणामुळे १८०० वर्ष वातावरणीय तापमान वाढत राहते तर पुढील १८०० वर्ष कमी होत जाते. छोट्या हिमयुगानंतर तापमानवाढीचे चक्र सुरू झाले आहे. तापमानाची ही नैसर्गिक वाढ अधिक वाढवण्यात मानवाचा मोठा हात आहे. नैसर्गिक कारणांमुळे भविष्यात जेवढे तापमान वाढले असते त्यापेक्षा किती तरी जास्त प्रमाणात ते वाढेल. (क्रमश:)

**सोडवा सुडोकू**

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ५०४**

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 3 |
| 3 | 2 | 4 | |
| | 4 | 3 | 2 |
| 2 | | | |

**क्रमांक ५०३ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | 1 | 4 | 2 |
| 2 | 4 | 1 | 3 |
| 1 | 3 | 2 | 4 |
| 4 | 2 | 3 | 1 |

**हास्यविनोद**



विद्यार्थांना शिक्षकांनी चार पानी निबंध लिहायला सांगितला. विषय होता, 'आळस म्हणजे काय?' एका विद्यार्थाने चारी पाने कोरी ठेवली आणि शेवटी तीनच शब्द लिहिले. ''यालाच म्हणतात आळस.''

**दगडू** : ओ दुकानदार, केळी कशी दिली राव..... दुकानदार: एक रुपयाला एक
**दगडू** : काय तरी काय. साठ पैशाला देता का बोला.
**दुकानदार** : अहो साठ पैशाला तर त्याचं केवळ साल येईल.
**दगडू** : ठीक आहे. मग हे चाळीस पैसे घ्या आणि मला फक्त सालीशिवाय केळं द्या.

**महिलायन**

## फंडे केसांच्या आरोग्याचे

स्थानिक हेअर प्रॉडक्टस वापरणं टाळावं. त्याचप्रमाणे आयुर्वेदिक हेअर प्रॉडक्टसना महत्त्व द्यावं. केस मुलायम आणि आरोग्यपूर्ण होण्यासाठी योग, व्यायाम आणि मेडिटेशनलाही महत्त्व द्यावं. महिन्यातून एकदा हेअर स्पाही करु शकतो. गरम पाण्यानं केस धुणं टाळा. त्याचप्रमाणे केसांमध्ये हेअर ड्रायरचा वापर करु नये. वेळोवेळी केसांचं कंडीशनिंगही करत रहा. आठवड्यातून तीन ते चार वेळा केस जरुर धुवा. खाण्यामध्ये ताजी फळं, हिरव्या भाज्या यांचा समावेश असावा. ई जीवनसत्त्वयुक्त पदार्थांचा आहारात समावेश असावा. केसांना दोन तोंडं फुटली असतील तर ते कापूट टाका. वारंवार हेअरस्टाईल बदलू नये. त्यामुळे केसांवर लावण्यात येणाऱ्या केमिकल्समुळे केसांना नुकसान पोहोचू शकतं. धूळ, माती, प्रदूषण यापासून केसांचा बचाव करण्यासाठी घरातून बाहेर पडताना केस झाकून घ्यावेत. केस रंगवतानाही काही गोष्टींची सावधगिरी बाळगली पाहिजे. ॲलर्जी असेल तर केस रंगवू नयेत. अमोनियमयुक्त डायचा वापर करण्याऐवजी प्रोटीनयुक्त डायचा वापर करावा. केस धुतल्यानंतर ते सुकवल्यानंतरच त्यांना रंग लावावा. पहिल्यांदाच केसांना रंग लावत असाल तर त्याआधी हेअर एक्स्पर्टचा सल्ला घ्यावा. केसांना लावण्याचा रंग चांगल्या गुणवत्तेचाच आहे, याची खात्री करुन घ्या. केस रंगवण्याआधी किंवा रंगवल्यानंतर १५-२० दिवसांपर्यंत तरी केसांवर कोणताही प्रयोग करु नये. अशा काही गोष्टी लक्षात घेतल्यात तर तुमच्या केसांचं आरोग्य निश्चितच चांगलं ठेवता येईल. (समाप्त)

**बालांगण**

## ओळख किल्ल्यांची

### रवळागड

नाशिक जिल्ह्याच्या सुरगणा तालूक्यातून सह्याद्रीची एक डोंगररांग पूर्वीकडे जाते, त्या रांगेस सातमाळ रांग म्हणतात. याच सातमाळ रांगेत मार्किंडा किल्ल्याजवळ रवळागड उभा आहे. या किल्यास जाण्यासाठी वणी-बाबापूर-मुळाने मार्गे रवळ्या-जवळ्याची खिंड गाठावी लागते. या किल्ल्याची चढाई करण्यासाठी चिमणी कलार्यांबंग या प्रकारची अनुभूती घेत आणि नंतर १५ फुटांचा टप्पा दोर लावून चढावा लागतो. याच्या माथ्यावर शेंदूर फासलेला गणपती, वाड्याचे आणि घरांचे चौथरे आणि पाण्याची टाकी पाहायला मिळतात. पण हे सर्व दुर्ग अवशेष पाहत असताना आपणास प्रचंड काट्याकुट्यांचा आणि निवडुंगाच्या फडांचा त्रास सहन करावा लागतो. हा गड शिवरायांनी १६७० नंतर जिंकून घेतला.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

## मुदत संपल्यानंतर प्रचार; २४ तासात म्हणणे मांडण्याचे आदेश

# मुख्यमंत्री शिंदे यांना निवडणूक आयोगाचा दणका


■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीच्या प्रचार तोफा थंडावल्या असल्या तरी शिवसेनेकडून छुप्या मार्गाने प्रचार केला जात असल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा पक्षाच्या विरोधात काँग्रेसने तक्रार दाखल केली आहे. निवडणूक आयोगाने तत्काळ दखल घेत २४ तासाच्या आत आपले म्हणणे मांडण्याचे आदेश शिंदे यांना दिले आहे. त्यामुळे आता या सर्व प्रकरणाकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या वतीने मराठी माध्यमाच्या सिरीयलमध्ये पक्षाच्या जाहिराती केल्या जात असल्याचा आरोप काँग्रेसच्या

### काय म्हटलंय निवडणूक आयोगानं?

● शिंदे गटाकडून छुपा प्रचार करण्यात आल्याच्या काँग्रेसच्या आरोपानंतर निवडणूक आयोगानं या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. निवडणूक आयोगानं शिवसेना शिंदे गटाला येत्या २४ तासांत म्हणणं मांडण्याचा आदेश दिला आहे. यासंदर्भातलं पत्रकही जारी करण्यात आलं आहे.



वतीने करण्यात आला आहे. या संदर्भातली तक्रार काँग्रेसचे नेते सचिन सावंत यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. त्यांच्या या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने तत्काळ दाखल घेत २४ तासात शिंदे यांना म्हणणे मांडण्याचे आदेश दिले आहेत. त्या संदर्भातील पत्रक जारी करण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाच्या या पत्रानंतर आता सावंत यांनी या प्रकरणात तत्काळ गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. हे प्रकरण म्हणजे 'पेड न्यूज'चाच एक प्रकार असल्याचे सावंत यांनी म्हटले आहे. त्यामुळे केवळ निवडणूक आयोगाच्या नोटीसीने काहीही होणार नाहीस तर शिंदे यांच्या पक्षाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.




"काही मराठी वाहिन्यांवर मराठी सिरीयल सुरू आहेत. या सिरीयलच्या माध्यमातून शिंदे यांच्या पक्षाचा प्रचार केला जात आहे; मात्र या संदर्भातला खर्च निवडणूक खर्चामध्ये दाखवण्यात आलेला नाही. त्यामुळे हा 'पेड न्यूज'चा प्रकार आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत तत्काळ गुन्हा दाखल करावा."

— सचिन सावंत, काँग्रेस नेते

### व्हॉट्सअ‍ॅपवर देखील करडी नजर

● महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता संपला आहे. राज्यामध्ये आचारसंहिता लागू झाली असून प्रचारसंबंधित कोणतीही सोशल मीडिया पोस्ट करण्यास आता बंदी आहे. सायबर पोलीस व निवडणूक आयोगाची सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर करडी नजर आहे. यामध्ये युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्वीटर व व्हॉट्सअ‍ॅप छुप्या पद्धतीने प्रचार करत नसल्याची खात्री अधिकाऱ्यांकडून केली जात आहे. 20 ऑक्टोबर ते 18 नोव्हेंबर दरम्यान सोशल मीडियावर आचारसंहितेचा भंग करणाऱ्या 99 जणांच्या विरोधात कारवाई करुन गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

# मतदारांच्या सोयीसाठी मेट्रोच्या फेऱ्यांमध्ये वाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त जनतेने सहभागी व्हावे, यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलत महामुंबई मेट्रो ऑपरेशन्स कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एमएमएमओसीएल) २० नोव्हेंबरला मेट्रो सेवेची वेळ वाढवली आहे. मतदार आणि निवडणूक कर्मचाऱ्यांना सहज आणि सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देणे, हा या विस्तारित सेवांचा उद्देश आहे.

मतदानाच्या दिवशी प्रवासाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन मेट्रोसेवा नेहमीपेक्षा लवकर सुरू होतील आणि रात्री उशिरापर्यंत सुरू राहतील. २० नोव्हेंबरला पहिली मेट्रो पहाटे ४ वाजता गुंदवली, दहिसर (पूर्व) आणि अंधेरी (पश्चिम) स्थानकांवरून सोडण्यात आली. तर शेवटची मेट्रो २० नोव्हेंबरच्या मध्यरात्री म्हणजे २१ नोव्हेंबरला १ वाजता सुटेल. एकूण १९ अतिरिक्त फेऱ्या नियोजित करण्यात आल्या आहेत. यामुळे एकूण दैनिक फेऱ्या २४३ वरून २६२ फेऱ्यांपर्यंत वाढतील. नियमित सेवा सकाळी ०५:२२ वाजल्यापासून ते रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहणार आहेत. निवडणूक अधिकाऱ्यांचा त्यांच्या मतदान केंद्रांपर्यंतचा आणि परतीचा प्रवास सुलभ करण्यासाठी तसेच सर्वसामान्य जनतेसाठी सोयीस्कर वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देत मतदारांचा अधिक मोठ्या प्रमाणावर सहभाग वाढवण्यासाठी मेट्रोच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत.

### विशेष वाढीव वेळा पुढीलप्रमाणे...

- **सकाळच्या सेवा :** ०४:०० वाजता ०५:२२ वाजता
- **रात्री उशिराच्या सेवा :** रात्री ११ वाजता मध्यरात्री १ वाजता
- या वाढीव वेळेत मेट्रो दर २० मिनिटांनी उपलब्ध असेल



# सीईटींचा अभ्यासक्रम जाहीर; परीक्षेसाठीच्या प्रश्नसंख्येत बदल

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ज्यात इंजिनिअरिंग, फार्मसी, अ‍ॅग्रिकल्चरसह एमबीए, एमसीए, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, बी डिझाईन तसेच बीसीए, बीएमएस बीबीए आदी अभ्यासक्रमांसाठी घेत असलेल्या प्रवेश परीक्षांचा अभ्यासक्रम सीईटी सेलकडून जाहीर केला आहे.

२०२५-२६चे शैक्षणिक सत्र निर्धारित वेळेत सुरू करण्यासाठी सीईटी सेलने तयारी सुरु केली आहे. त्यानुसार विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली सामायिक प्रवेश परीक्षा लवकरच घेण्यासाठी अभ्यासक्रम काय असणार हे जाहीर केले आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या सीईटीचा अभ्यासक्रम जाहीर केला आहे.



इंजिनिअरिंग, फार्मसी, अशा विषयांच्या सामायिक प्रवेश परीक्षेच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आला आहे. तर यंदापासून नव्यानेच सीईटी कक्षाच्या अखत्यारित आलेल्या बीबीए बीसीए अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेसाठीच्या प्रश्नसंख्येत बदल करण्यात आले आहेत.

प्रामुख्याने सर्वाधिक नोंदणी होत असलेल्या एमएचटी सीईटीतील प्रश्न राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमाशी निगडित असतील. या परीक्षेची गुणदान पध्दत देखील जाहीर केली आहे. कॉम्प्युटर बेस्ड एमसीक्यू पध्दतीने होणार असून, यामध्ये निगेटिव्ह मार्किंग राहणार नाही. एमएचटी सीईटी परीक्षा प्रश्नपत्रिकेची काठिण्य पातळी गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्रासाठी जेईई मेन्सच्या बरोबरीची असेल आणि जीवशास्त्राची काठिण्य पातळी 'नीट' परीक्षेच्या बरोबरीची असेल. गेल्या वर्षीच्या तुलनेत शास्त्र तीन विषयांसाठी एक-एक नवे प्रकरण समाविष्ट करण्यात आले आहे.

## » Selected

### निवडणूक कर्मचाऱ्यांवर उपाशी राहण्याची वेळ

**छत्रपती संभाजीनगर** : महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक आता अवघ्या एक दिवसांवर येऊन ठेपली आहे. प्रत्येक मतदारसंघात इलेक्शन ड्यूटी बजावण्यासाठी कर्मचारी व अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री विधानसभा मतदारसंघात तशीच नियुक्ती करण्यात आली होती; मात्र कर्मचाऱ्यांना काम करूनही जेवण मिळाले नाही. येथील पोलीस कर्मचाऱ्यांनी घरून डबा मागवून जेवण केले. या प्रकारामुळे कर्मचाऱ्यांममध्ये नाराजी आहे.

### श्रीनिवास पवार यांच्या शोरूमची रात्री तपासणी

**बारामती** : बारामती येथे श्रीनिवास पवार यांच्या 'शरयू मोटर्स' या शोरूम मध्ये रात्री पोलिसांनी सर्च ऑपरेशन केले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही तपासणी करण्यात आल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. यासंबंधी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. त्या तक्रारी नंतर ही कारवाई झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. मात्र नेमके या शोरूम मध्ये काय सापडले? कोणत्या कारणाने सर्च करण्यात आले? याची अधिकृत माहिती देण्यात आली नाही.

### 'ऑडी' इंडियाकडून नवीन ऑडी क्यू ७ साठी बुकिंग सुरु

**मुंबई** : ऑडी या जर्मन लक्झरी कार उत्पादक कंपनीने भारतात नवीन ऑडी क्यू७ साठी बुकिंग्जना सुरूवात केली. नवीन ऑडी क्यू७ ऑडी इंडिया वेबसाइट किंवा 'मायऑडी कनेक्ट' अ‍ॅप्लीकेशनच्या माध्यमातून २,००,००० रूपयांच्या सुरूवातीच्या बुकिंग रकमेमध्ये बुक करता येऊ शकते. औरंगाबादमधील एसएव्हीडब्ल्यूआयपीएल प्लांट येथे स्थानिक पातळीवर असेम्बल करण्यात आलेली नवीन ऑडी क्यू७ भारतात २८ नोव्हेंबर २०२४ रोजी लाँच करण्यात येईल. ३४० एचपी शक्ती आणि ५०० एनएम टॉर्क निर्माण करणारे शक्तिशाली ३.० लिटर व्ही६ टीएफएसआय इंजिन असलेली नवीन ऑडी क्यू७ फक्त ५.६ सेकंदांमध्ये ० ते १०० किमी/तास गती प्राप्त करू शकते आणि अव्वल गती २५० किमी/तास आहे.

ऑडी इंडियाचे प्रमुख बलबीर सिंग धिल्लों म्हणाले, "ऑडी क्यू७ आमचे सर्वात आयकॉनिक उत्पादन असण्यासोबत सेलिब्रिटींसह सर्व लक्ष्य समूहांमध्ये लोकप्रिय आहे. नवीन ऑडी क्यू७ सह आम्ही सुधारित वैशिष्ट्ये, नवीन एक्स्टीरिअर डिझाइन आणि नवीन लक्षवेधक लाइट्स देत आहोत. आम्ही औरंगाबादमधील आमच्या ग्रुप प्लांटमध्ये नवीन ऑडी क्यू७ च्या स्थानिक असेम्ब्लीला सुरूवात केली आहे आणि २८ नोव्हेंबर २०२४ रोजी ही वेईकल लाँच करण्यास सज्ज आहोत."
नवीन ऑडी क्यू७ पाच एक्स्टीरिअर रंगांमध्ये उपलब्ध असेल: साखीर गोल्ड, वेटोमो ब्ल्यू, मिथोस ब्लॅक, समुराई ग्रे आणि ग्लेशियर व्हाइट. इंटीरिअर दोन रंगांच्या पर्यायांमध्ये ऑफर करण्यात येईल: सिडार ब्राऊन आणि सायगा बीज. ग्राहक ऑडी इंडिया वेबसाइट (www.audi.in) आणि 'मायऑडी कनेक्ट' अ‍ॅपच्या माध्यमातून ऑनलाइन ऑडी क्यू७ बुक करू शकतात.

## डोंबिवलीसह ग्रामीण भागात दारूचा महापूर ; 3 अड्ड्यांवर धाड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**डोंबिवली :** राष्ट्रसंचार विधानसभा निवडणूक सुव्यवस्थित पार पाडण्यासाठी आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार रविवारपासूनच ड्राय-डेच्या अंमलबजावणीला सुरूवात करण्यात आली आहे. मतदानाच्या पूर्वसंध्येला सर्व प्रकारच्या मद्य विक्रीला शासनाने बंदी घातली आहे. त्यामुळे अधिकृत परवानाधारी मद्य विक्रीची दुकाने बंद आहेत. अनेक मद्यपींनी गावठी दारूच्या अड्ड्यांवर धाव घेतली आहे. स्थानिक पोलिसांसह क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटने असे ३ अड्डे शोधून टाकलेल्या धाडीत दारूचा साठा जप्त केला आहे.

पश्चिम डों बिवलीतील मोठागावच्या टेकडी परिसरात असलेल्या शिवमंदिराजवळच्या झाडाखाली एक जण सरमाडी दारूची विक्री करत असल्याची माहिती क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित शिंदे यांना मिळाली होती. सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक दत्ताराम भोसले, हवालदार यु. जी. खंदारे, दीपक महाजन घटनास्थळी रवाना झाले. तेथे पिंटू तुकाराम भोईर हा एका ड्रममध्ये १५ लीटर सरमाडी (हातभट्टी) दारू विक्रीसाठी बसला होता. पथकाने त्याला पकडून ताब्यात घेतले. विनापरवाना बेकायदा मद्य विक्री केल्याच्या आरोपाखाली हवालदार गोरक्ष शेकडे यांच्या फिर्यादीवरून विष्णूनगर पोलिस ठाण्यात पिंटू भोईर याच्या विरूध्द गुन्हा दाखल केला. दुसऱ्या घटनेत विष्णूनगर पोलिसांनी मोठागावातील शिवमंदिराच्या जवळ असलेल्या अड्ड्यावर छापा टाकून गणेश संपत सहाने याच्याकडील सरमाडी दारूचा साठा जप्त केला. या प्रकरणी हवालदार श्रीराम मिसाळ यांनी विनापरवाना दारू साठा करून विक्री केल्याच्या सरकारतर्फे देण्यात आलेल्या तक्रारीनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तिसऱ्या प्रकरणात क्राईम ब्रँचच्या कल्याण युनिटचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अजित शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 27 गावांपैकी काटई-बदलापूर पाईपलाईन रोडला असलेल्या कोळेगावातील हनुमान मंदिराजवळ छापा टाकून 20 लीटर सरमाडी दारूचा साठा जप्त केला. विनापरवानाही मद्य विक्री केल्याप्रकरणी हवालदार प्रशांत वानखेडे यांच्या फिर्यादीनुसार राजेश ओमप्रकाश गुप्ता याच्या विरूध्द मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## उबाठा गटाचे उपनेते सदानंद थरवळ यांचा शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** डोंबिवलीतील उबाठा गटाचे उपनेते आणि ज्येष्ठ शिवसैनिक सदानंद थरवळ यांनी उबाठा गटाला अखेरचा 'जय महाराष्ट्र' म्हणत कायमचा रामराम ठोकला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत थरवळ यांनी महायुतीतील शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला. यावेळी त्यांचा मुलगा अभिजित थरवळ आणि असंख्य शिवसैनिकांनीही हाती भगवा झेंडा घेतन शिंदेगटातील शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश केला.

सदानंद थरवळ यांनी शिवसेनेचे डोंबिवली शहरप्रमुख म्हणून अनेक वर्षे काम केले होते. शिवसेनेमध्ये उठाव झाला तेव्हाही त्यांनी उबाठा गटामध्येच कायम राहून प्रामाणिकपणे आपले काम सुरू ठेवले. मात्र असे असूनही विधानसभा निवडणुकीत उबाठा गटाने पक्षाच्या बाहेरून आलेल्या दीपेश म्हात्रे यांना डोंबिवली विधानसभा मतदारसंघातून संधी दिल्यामुळे थरवळांनी पक्षनेतृत्वावर नाराजी व्यक्त केली. अखेर व्यथित होऊन त्यांनी उबाठा गटाच्या सर्व पदांचा राजीनामाही दिला होता. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.

ठाकरे गटातून बाहेर पडताना थरवळांनी अनेक खुलासे केले आहेत. थरवळ म्हणाले की, गेली अनेक वर्षे आपण चुकीच्या ठिकाणी, चुकीच्या लोकांसोबत काम करत होतो. मात्र सच्चा शिवसैनिकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेमध्ये पक्षप्रवेश करून आता काम करण्याची संधी मिळत असल्याबद्दल आनंद आणि समाधान वाटत आहे, असं मत थरवळ यांनी व्यक्त केले.

## प्रदूषणाने मुंबईकरांचा कोंडला श्वास

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**मुंबई :** मुंबईतील देवनार, बीकेसी, अंधेरी, बोरिवली, घाटकोपर, कांदिवली, मालाड, शिवडी, माझगाव, चेंबूर, कुलाबा या ठिकाणी हवेची गुणवत्ता घसरली. दृश्यमानता कमी झाली असून, नागरिकांना श्वास घ्यायलाही त्रास होत आहे.

# कालिचरण महाराज यांच्या टीकेला मनोज जरांगेंचे उत्तर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**संभाजीनगर :** छत्रपती संभाजी नगर येथे आयोजित केलेल्या एका धार्मिक सभेत मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्यावर स्वयंघोषित महाराज कालीचरण यांनी वादग्रस्त वक्तव्य केले होते. मनोज जरांगे यांचे नाव न घेता त्यांनी मराठा आरक्षणाचा नेता असा उल्लेख करत ते हिंदुत्व संपवणारा राक्षस असल्याचा आरोप त्यांनी केला होता. त्याच्या या वक्तव्यावर सर्व स्तरातून संताप व्यक्त करण्यात येत होता. त्यानंतर आता मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी कालिचरण महाराज यांना सडेतोड उत्तर दिले आहे.



मनोज जरांगे पाटील यांनी कालीचरण यांच्या विधानावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले, "मी साधू-संताचा आदर करतो. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे हिंदुत्व मानतो. माझ्याबद्दल जे बरळत आहेत, त्यांना बरळू द्यावे. कारण ज्याने एका पक्षाचा ठेका घेतला आहे, अशांबद्दल आपण काही बोलले नाही पाहिजे. संत-महात्म्यांचा आदर करणे हे छत्रपती शिवाजी महाराजांनी शिकवले आहे. आम्ही ज्या हिंदू धर्मात आहोत, त्यातील सर्वात कट्टर वर्ग आहे मराठा समाज. पण हाच समाज आज अडचणीत आलेला आहे." असे विधान त्यांनी केले.

# ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर काय असणार सुविधा?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीसाठी उद्या बुधवारी मतदान पार पडणार आहे. मतदानाच्या दिवशी वयोमान आणि आजारपणामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक मतदारांना मतदान करताना अडचणीचा सामना करावा लागतो. यामुळे मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम होतो. यंदा भारतीय निवडणूक आयोगाकडून ८५ वर्षापुढील ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदारांना मतदान करण्यासाठी विशेष उपलब्ध असणार आहे.




ज्येष्ठ नागरिकांना वयोमान आणि आजारपणामुळे मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवता येत नाही. त्यामुळे या मतदारांना मतदानापासून वंचित राहावे लागतं. यामुळे निवडणूक आयोगाने ८० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष उपक्रम राबवला आहे. महाराष्ट्रातील मतदान केंद्राच्या तळमजल्यावर किंवा गेटजवळ व्हीलचेअरची सुविधा ही ज्येष्ठ आणि दिव्यांग मतदारांसाठी करण्यात आली आहे. राज्यातील सर्व मतदान केंद्रावर अशी सोय केली जाणार आहे. यासाठी पीडब्लूडी आणि स्वयंसेवकांद्वारे मदत केली जाणार आहे.

## रुग्णालयातून डिस्चार्ज मिळताच अनिल देशमुखांचा सत्ताधाऱ्यांना इशारा

# "मी सगळ्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही"

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्याचे माजी गृहमंत्री आणि राष्ट्रवाद काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते अनिल देशमुख यांच्यावर सोमवारी रात्री जीवघेणा हल्ला करण्यात आला. काटोल मतदारसंघासोबत नागपूर व राज्याच्या राजकीय वर्तुळातही उमटल्या आहेत. महाविकास आघाडीच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी मतदानाच्या काही दिवसाआधी असा हल्ला होणे याबाबत चिंता व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस क्षाचे राष्ट्री अध्यक्ष शरद पवार, पक्षाच्या कार्यकारी अध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यासह अन्य नेत्यांनी या हल्ल्याचा निषेध केला आहे. दरम्यान, त्यांना रुग्णालयातून आता सोडण्यात आले आहे. रुग्णालायतून बाहेर येताच त्यांनी माध्यमांना प्रतिक्रिया देत सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. सोमवारी रात्री हल्ला झाल्यानंतर त्यांना रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आले होते. काल त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. डिस्चार्ज मिळताच त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, "माझ्यावर दगडं मारा किंवा गोळ्या झाडा अनिल देशमुख मरणार नाही. मी सगळ्यांना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही."



अनिल देशमुख यांच्यावरच्या हल्ला प्रकरणात चार अज्ञातांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काटोल या ठिकाणी अनिल देशमुखांवर झालेल्या हल्ल्याचं प्रकरण पोलिसांनी गांभीर्याने घेतलं आहे. घटनास्थळी आढळलेल्या पुराव्यांच्या आधारे तपास करणं सुरु आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई केली जाईल असं पोलिसांनी म्हटलं आहे.

"काटोलमध्ये अनिल देशमुख यांच्यावर जो हल्ला झाला, ते प्रकरण पोलिसांनी गांभीर्याने घेतलं आहे. चार अज्ञातांविरोधात आम्ही हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळी विशेष पोलीस निरीक्षकांनी भेट दिली आहे. तांत्रिक पुरावेही गोळा केले जात आहेत. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्था व्यवस्थित आहे. जनतेने कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नये. कायदा-सुव्यवस्थेचा भंग करण्यात आला तर कठोर कारवाई केली जाईल." अशी प्रतिक्रिया नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनी दिली आहे.

बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ पंढरी संचार

# विश्ववेध

# हाडे-स्नायूंसाठी गुणकारी आहार

*हाडे व स्नायूंचे आरोग्य चांगले असणे महत्त्वाचे असते. मात्र, महिलांचे वय ३५ वर्षे पूर्ण होताच त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हाडांमध्ये दुखणे, पाठदुखी, पाय दुखणे आणि चिडचिड होणे, यासारख्या समस्या हाडांच्या कमकुवतपणाशी संबंधित काही लक्षणे आहेत जी महिलांना ३५-४० वर्षाच्या वयात जाणवतात. हाडे मजबूत करण्यासाठी आपल्या रोजच्या आहारात काही गोष्टींचा समावेश करणे खूप गरजेचे आहे, असे तज्ज्ञ सांगतात. क्याच्या पस्तिशीनंतर महिलांनी या पदार्थांचे सेवन केल्याने हाडे आणि स्नायू मजबूत होतात आणि अनेक आरोग्य समस्या दूर होतात, असे तज्ज्ञ सांगतात.*



**पालक :** हार्मोनल पातळीत बदल झाल्यामुळे महिलांना अशक्तपणा जाणवू शकतो. अशा परिस्थितीत शरीराला लोहाच्या अतिरिक्त डोसची आवश्यकता असू शकते. अशा परिस्थितीत पालक आणि हिरव्या पालेभाज्यांचे सेवन करावे. यामुळे महिलांच्या शरीरातील लोहाची कमतरता दूर होते.

**दही :** प्रोबायोटिक्ससोबतच दह्यामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी आढळून येते, ज्यामुळे हाडे मजबूत होतात. दह्यामुळे पचनशक्ती वाढते आणि शरीराला पोषक तत्त्वे शोषण्यास मदत होते.





**ब्रोकोली :** कॅल्शियम आणि व्हिटॅमिन के हाडांसाठी अत्यंत आवश्यक घटक मानले जातात, जे ब्रोकोलीमध्ये मुबलक प्रमाणात आढळतात. ब्रोकोली हाडांची घनता वाढवते आणि कर्करोगासारख्या आजारांपासूनही संरक्षण देते. ब्रोकोली नियमितपणे भाजी किंवा कोशिबीर म्हणून खावी.



**एवोकॅडो :** एवोकॅडो हे निरोगी चरबीने समृद्ध असते व याला बटर फ्रूट देखील म्हणतात. हे त्वचेसाठी देखील खूप चांगले मानले जाते. ३५ वर्षांनंतर त्वचेमध्ये बदल होऊ लागतात आणि त्वचेतील कोरडेपणा वाढतो, त्वचेची लवचीकता कमी होऊ लागते आणि त्वचेवर सुरकुत्या दिसू लागतात. एवोकॅडो खाल्ल्याने त्वचेला व्हिटॅमिन ई आणि अँटिऑक्सिडंटस्?चा फायदा होतो, ज्यामुळे त्वचा तरुण राहते.

# गूढ सोन्याच्या मुखवट्याचे



ग्रीसमध्ये सापडलेल्या तब्बल ३,५०० वर्षांपूर्वीच्या सोन्याच्या मुखवट्याबाबत अनेक दशकांपासून पुरातत्त्व संशोधकांमध्ये कुतूहल व मतभेदही आहेत. हा मुखवटा प्राचीन ग्रीक साहित्यात वर्णन केलेल्या राजा अगामेमोन (अगेम्नोन) याचा मानला जातो. होमरचे 'इलियड' हे महाकाव्य जगप्रसिद्ध आहे. ट्रोजन युद्धाशी संबंधित असलेले हे महाकाव्य सत्य घटनेवर आधारित होते, असे काही संशोधकांना या मुखवट्यावरून वाटते. दक्षिण ग्रीसमध्ये मायसीने या पुरातत्त्वस्थळी केलेल्या उत्खननात हा मुखवटा सापडला होता. हा सोन्याचा मुखवटा इसवी सन पूर्व १५०० या काळातील आहे.

सन १८७६ मध्ये जर्मन पुरातत्त्व संशोधक हेनरीक श्लीमॅन यांना दक्षिण ग्रीसमधील मायसीने येथील कांस्य युगातील मकबऱ्याच्या उत्खननावेळी हा मुखवटा सापडला होता. श्लीमॅन यांचे म्हणणे होते की, पौराणिक राजा अगामेमोन याच्या शवासोबत हा मुखवटा होता. कवी होमर याने लिहिलेल्या 'इलियड' या महाकाव्यात याच राजाने ग्रीक वेढ्याचे नेतृत्व केल्याचे वर्णन आहे. अगामेमोन याने मायसीनेवर राज्य केले होते. श्लीमॅन यांच्या संशोधनामुळे या मुखवट्याला 'मास्क ऑफ अगामेमोन' असे म्हटले जाते. मात्र, मुखवट्याचा काळ विचारात घेता हे समीकरण जुळत नाही. या मुखवट्याची कलात्मक शैली आणि पेलोपोनिस प्रायद्वीपावरील पुरातत्त्वीय स्थळाच्या संशोधनानंतर असे दिसून येते की, हा मुखवटा इसवी सन पूर्व १५०० या काळातील आहे. त्यामुळे अगामेमोनच्या शेकडो वर्षे आधीच हा मुखवटा बनलेला होता, असे दिसते. काही तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार तर हा मुखवटा त्यापेक्षाही अधिक प्राचीन असू शकतो. हा मुखवटा सोन्याच्या एका पातळ पत्र्यापासून बनवलेला आहे. एखाद्या व्यक्तीचे तो जिवंत असतानाच चेहऱ्याचे मोजमाप घेऊन मुखवटा बनवला असावा, असे दिसते. त्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर हा मुखवटा परिधान करून त्याला दफन केले असावे. त्यामुळे या मुखवट्याला 'मृत्यूचा मुखवटा' असेही म्हटले जाते. हा मुखवटा ज्या शाही मकबऱ्यात सापडला, तिथे आठ लोकांचे अवशेष होते. या सर्व लोकांकडे शस्त्रे होती; पण केवळ पाचजणांनाच सोन्याचे मुखवटे घातले होते. ते मृत व्यक्तींच्या शाही स्थितीचा संकेत आहे. कांस्य युगाच्या काळात मायसेनियन लोक होते जे इसवी सन पूर्व १७५० नंतर संपूर्ण दक्षिण ग्रीसमध्ये राहत होते. ते ग्रीक भाषेच्या प्रारंभिक स्वरूपातील भाषेत बोलत असत. त्यांची संस्कृती क्रेटच्या मिनोअन संस्कृतीने प्रभावित होती. श्लीमॅन यांचे म्हणणे होते की, मायसेनियन अवशेष ट्रोजन युद्धाचे ऐतिहासिक वास्तव दर्शवतात. काही पुरातत्त्व संशोधकांना वाटते की, मायसेनियन संस्कृती इसवी सन पूर्व १२०० मध्ये उत्तर कांस्य युगाच्या अखेरच्या काळात संपुष्टात आली. त्यानंतर शेकडो वर्षांनी ट्रोजन युद्ध झाले.




# केळीचे फुलही आरोग्यदायी

आरोग्यासाठी केळाचे सेवन आरोग्यदायी असते हे आपल्याला माहिती आहेच; पण केळफूलही आरोग्यदायी असते याची अनेकांना कल्पना नसते. केळीच्या फुलांमध्ये फायबर, प्रथिने, पोटॅशियम, कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम, तांबे, फॉस्फरस आणि व्हिटामिन ईसारखी खनिजे आणि जीवनसत्त्वे आढळतात. हे फूल कच्चे किंवा शिजवून, तसेच सूप, कोशिंबीर आणि तळूनदेखील खाल्ले जाऊ शकते. याशिवाय केळीच्या फुलाचा हेअर पॅक किंवा फेस पॅक म्हणूनही वापर करता येतो. अनेक महिलांना अशक्तपणाचा त्रास असतो. केळीची फुले लोहाचा चांगला स्रोत मानली जातात. याचे सेवन केल्याने हिमोग्लोबीनची वेगाने वाढ होते, असे तज्ज्ञ सांगतात. केळीच्या फुलांचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते. ज्याद्वारे शरीरातील साखरदेखील नियंत्रित केली जाते. अशा प्रकारे, हे फूल मधुमेह असलेल्या रुग्णांसाठीदेखील फायदेशीर आहे. केळीच्या फुलांमध्ये निराशाविरोधी अर्थात अँटिडिप्रेशन घटक असतात, जे मानसिक तणावापासून आपले संरक्षण करतात आणि आपला मूड सुधारण्यास मदत करतात. केळफुलात डाएटरी फायबर्स आणि व्हिटामिन ईसोबतच अँटिऑक्सिडंटस्देखील मुबलक प्रमाणात आढळतात. यामुळे शरीरातील फ्री रॅडिकल्सचा धोका कमी करण्यास मदत होते. परिणामी, कॅन्सरचा धोकादेखील मंदावतो.

# समुद्रात आढळले प्राचीन मंदिराचे अवशेष

पुरातत्त्व संशोधकांनी इटलीतील नेपल्सजवळ समुद्रातळाशी दोन हजार वर्षांपूर्वीच्या मंदिराचे अवशेष शोधून काढले आहेत. या ठिकाणी संगमरवराच्या प्राचीन वेदी, खांबांचे अवशेष आढळले. अरेबियन पेनिन्सुलामधील नबातिया या प्राचीन साम्राज्यातून स्थलांतरित झालेल्या लोकांनी हे मंदिर बांधले होते. इंडियाना जोन्स अँड द लास्ट क्रुसेड या चित्रपटात झळकलेल्या व पर्वतकड्यात कोरीव काम करून बांधलेल्या ट्रेझरीच्या निर्मितीमागे हेच लोक होते. हे मंदिर काळाच्या ओघात समुद्राच्या पाण्याखाली गेले. याठिकाणी काही भांड्यांचे अवशेषही सापडले आहेत. या संशोधनाची माहिती अँटिक्विटी या नियतकालिकात प्रसिद्ध झाली आहे. नेपल्समधील सदर्न ग्रॅज्युएट स्कूल या शिक्षण संस्थेतील सागरी पुरातत्त्व संशोधक मायकल स्टेफॅनिली यांनी याबाबतची माहिती दिली. त्यांनी हा शोध अत्यंत अनपेक्षित असा होता, असे सांगितले. हे मंदिर नेपल्सच्या पूर्वेला १६ किलोमीटरवर असलेल्या पोझ्झुली या किनारपट्टीवरील शहरात होते. रोमन काळात या शहराचे नाव प्युतोली असे होते. हे एक मोठे बंदर होते जिथून रोमन साम्राज्याच्या सर्व ठिकाणी जहाजे जात असत. येथून मोठ्या प्रमाणात धान्य व अन्य वस्तूंचा व्यापार होत असे. हे ठिकाण कॅम्पी फ्लेग्रेई या ज्वालामुखीय स्थळी आहे. तेथील ज्वालामुखीमुळे काळाच्या ओघात या शहराची स्थिती बदलली. शहराचा बराचसा भाग पाण्याखाली गेला व त्याबरोबरच हे मंदिरही पाण्यात बुडाले. याठिकाणी संशोधनात रोमन शैलीतील भिंतींचे अवशेषही सापडले आहेत.



# हिवाळ्यातील संजीवनी बाजरीची भाकरी

**सध्या जगभरात 'मिलेटस्' म्हणजेच भरडधान्याचे महत्त्व वाढत आहे. त्यामध्ये बाजरीचाही समावेश होतो. हिवाळ्यात बाजरीची भाकरी हा एक उत्तम पर्याय असू शकतो; कारण ती केवळ चवीलाच अप्रतिम नाही, तर आरोग्यासाठीही फायदेशीर आहे. बाजरी हे पोषक तत्त्वांनी युक्त धान्य आहे, जे हिवाळ्याच्या काळात शरीराला ऊब आणि ऊर्जा प्रदान करते. आहारतज्ज्ञ म्हणतात की, हिवाळ्यात बाजरीची भाकरी खाण्याचे अनेक फायदे आहेत. यामुळे शरीर उबदार राहते, पचन सुधारते, वजन नियंत्रित करण्यास मदत होते आणि हृदयाचे आरोग्य सुधारते. गव्हाच्या तुलनेत, बाजरी भरपूर पोषक आणि आरोग्यासाठी चांगली आहे. हिवाळ्यात बाजरीची भाकरी खाण्याचे आणखीही अनेक फायदे आहेत, त्यातील काही प्रमुख फायदे असे...**



### शरीराला उष्णता प्रदान करते

हिवाळ्यात शरीराला ऊर्जा आणि उबदारपणाची जास्त गरज असते. बाजरी नैसर्गिक उष्णता निर्माण करणारा अन्नपदार्थ आहे, जो शरीरात उष्णता निर्माण करतो.

याच्या सेवनाने हिवाळ्यात शरीर आतून उबदार राहते आणि सर्दी-खोकल्यासारख्या समस्यांपासूनही बचाव होतो.

### पाचक प्रणाली मजबूत करते

बाजरीत भरपूर प्रमाणात फायबर असते, जे पचन सुधारण्यास मदत करते. यामुळे आतड्याची हालचाल सुधारते आणि बद्धकोष्ठतासारख्या समस्या कमी होतात. हिवाळ्यात आतड्यांसंबंधी समस्या अनेकदा वाढतात; परंतु बाजरीची भाकरी या समस्यांपासून आराम मिळवून देण्यास मदत करते.

### हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर

बाजरी विशेषतः ओमेगा-३ फॅटी ॲसिडस्? आणि इतर आवश्यक पोषक तत्त्वांनी समृद्ध असते, ती हृदयाचे आरोग्य राखण्यास मदत करते. उच्च कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास मदत करते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते. हिवाळ्यात हृदयाशी संबंधित समस्या वाढू शकतात; परंतु बाजरीच्या भाकरीच्या सेवनाने त्यांना प्रतिबंध होतो.

### वजन नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त

जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर बाजरी हा एक उत्तम पर्याय असू शकतो. यामुळे शरीरात जास्त कॅलरीज राहत नाहीत आणि भरपूर प्रमाणात फायबर असल्यामुळे पोट बराच काळ भरल्यासारखे वाटते. हिवाळ्यात जास्त खाण्याची प्रवृत्ती असू शकते; परंतु बाजरी वजन वाढण्यास प्रतिबंध करते.


### कर्करोगापासून बचाव

बाजरीत अँटिऑक्सिडंटस्चे चांगले प्रमाण असते. ते शरीराला हानिकारक फ्री रॅडिकल्सपासून वाचवते. त्यामुळे कॅन्सरसारख्या आजारांपासून संरक्षण मिळण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, बाजरीत फायटोकेमिकल्स असतात जे कर्करोगाच्या पेशींच्या वाढीस प्रतिबंध करू शकतात. हिवाळ्यात संक्रमण आणि रोगांशी लढण्यासाठी बाजरी चांगला स्रोत आहे.

# तापमानवाढीचा परिणाम फुलांच्या सुगंधावर ?

जागतिक तापमानवाढीचे अनेक प्रकारचे दुष्परिणाम वेळोवेळी समोर येत असतात. तापमानवाढीचा फुलांच्या सुगंधावरही परिणाम होत असेल याची आपण कल्पना करणार नाही; पण तसे घडत असल्याचे संशोधकांचे मत आहे. फुलांच्या सुगंधात पूर्वीची विविधता व आकर्षकता राहिलेली नाही, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

फुले कीटकांना आकर्षित करण्यासाठी सुवास निर्माण करतात. त्यातून परागीभवन होऊन झाडांची पुढची पिढी तयार होत असते. सपुष्प वनस्पतींच्या पुनरुत्पादनात फुलांच्या सुवासाचा मोठा वाटा असतो. फुलांचा सुवास जेव्हा निर्माण होतो तेव्हा त्या वनस्पतीतील असंख्य जैवरासायनिक घटक एकत्र काम करीत असतात. हे घटक अस्थिर असतात. तापमान वाढले तर त्याचा परिणाम फुलांच्या सुवासावर होतो हे वैज्ञानिकांना माहिती आहे; पण ते सिद्ध करता आले नव्हते. फुलांच्या सुवासात हवामान बदलांनी फरक पडून त्याचा त्यांच्या पुनरुत्पादनावर तसेच वाढीवर वाईट परिणाम होत असतो. जेरुसलेममधील हिब्रू विद्यापीठाच्या वैज्ञानिकांनी याबाबत संशोधन केलेले असून, आजूबाजूचे तापमान वाढले तर त्यामुळे फुलांचा सुवास कमी होतो, म्हणजेच तो तयार करणारी जैविक रसायने कमी तयार होतात. तापमान वाढले की, त्याचा संबंध जागतिक हवामान बदलांशी असतो हे उघडच आहे. वनस्पती व परागीकारक यांच्या संबंधात त्यामुळे बाधा येते; कारण फुलांचा रंग व सुवास यावरच कीटक त्यांच्याकडे आकर्षित होत असतात. तापमानवाढीने जर फुलांच्या सुवासावर परिणाम झाला, तर कीटक फुलांकडे फिरकत नाहीत, असे जेरुसलेम विद्यीपाठाचे संशोधक ॲलन कॅनानी यांनी सांगितले. वनस्पतींमध्ये सुवास निर्माण करणाऱ्या यंत्रणेचे नियंत्रण करून त्यांनी सुवास निर्माण करणाऱ्या रसायनांवर नियंत्रण आणले. त्यामुळे त्यांना हा सुवास वाढवण्यासाठी आवश्यक असलेली रसायने कुठली हे समजले, त्यातून त्यांनी फुलातील सुवास कमी होणार नाही याची दक्षता घेणारी यंत्रणा तयार केली. पेटुनिया वनस्पती जर जास्त तापमानाला वाढवल्या गेल्या, तर त्यांच्या उत्पादनात नक्की फरक पडतो; कारण वाढत्या तापमानामुळे त्यांचा सुवास कमी होत असतो. तापमान वाढल्याने फेनिलप्रोपॅनॉईड्चे प्रमाण कमी होते व त्यामुले पेटुनियाच्या पी ७२० व ब्ल्यू स्पार्क या दोन प्रजातींत सुवास कमी होतो. जर्नल प्लांट सेल अँड एन्व्हायन्मेंट या नियतकालिकात हे संशोधन प्रसिद्ध झालेले आहे.




# तीन ताऱ्यांभोवती फिरणारा ग्रह

**अंतराळाच्या अनत पसाऱ्यात अनेक अनोखे ग्रह-तारे पाहायला मिळतात. खगोल शास्त्रज्ञांनी तीन तारे व त्याभोवती फिरणारा गुरूसारखा वायूंचा गोळाच असलेला एक बाह्यग्रह शोधून काढला आहे. हार्वर्ड स्मिथसॉनियन सेंटर फॉर ॲस्ट्रोफिजिक्स या अमेरिकेतील संस्थेच्या वैज्ञानिकांनी हे संशोधन केले आहे. द्वैती ताऱ्यांचा एक संच यात आढळला असून, आधी तो एकच तारा वाटत होता. हे द्वैती तारे तिसऱ्या एका ताऱ्याभोवती फिरत आहेत. या सर्व तारका प्रणालीत एक ग्रह तीन ताऱ्यांभोवती फिरत आहे. तीन ताऱ्यांभोवती फिरणारे ग्रह दुर्मीळ असतात. तीन ताऱ्यांभोवती फिरणारा ग्रह सापडण्याची ही चौथी वेळ आहे. विशेष म्हणजे हा ग्रह असलेली तारका प्रणाली पृथ्वीपासून तुलनेने जवळ आहे.**

**त्यामुळे त्याचे निरीक्षण जास्त चांगल्या पद्धतीने करता येणार आहे. यातील मुख्य तारा हा जास्त प्रकाशमान असून, इतर ताऱ्यांभोवतीही ग्रह फिरतात; पण त्यांच्यापेक्षा हा तारा जास्त प्रखर आहे. या ग्रहाचे नाव केइएलटी ४ एबी असे असून, तो वायू असलेला ग्रह आहे. गुरूइतक्या आकाराच्या असलेल्या या ग्रहाला परिवलनास तीन दिवस लागतात. तो केइएलटी-ए ताऱ्याभोवती फिरत आहे. इतर ताऱ्यांची नावे केइएलटी-बी व केइएलटी-सी अशी आहेत व ते दूर आहेत. तीस वर्षात ते एकमेकांभोवती प्रदक्षिणा पूर्ण करतात.**

**पण, केइएलटी ए ताऱ्याभोवती एक परिक्रमा पूर्ण करण्यास द्वैती ताऱ्यांना चार हजार वर्षे लागतात. केइएलटी ४ एबी हा ग्रह आपल्या सूर्याच्या चाळीस पट मोठा असलेल्या केइएलटी ए ताऱ्याभोवती फिरत आहे. इतर दोन तारे कमी प्रकाशमान असून, ते लांब अंतरावर आहेत. त्यांची प्रकाशमानता चंद्रापेक्षा जास्त नाही. वैज्ञानिकांच्या मते केइएलटी ग्रहमाला ही अनेक वर्षांपासून असावी. दोन तारे हे एकच तारा आहे, असे वाटत होते. तीन ताऱ्यांची ही प्रणाली म्हणजे वैज्ञानिकांना संशोधनाची मोठी संधी असून, केइएलटी ४ एबीसारखा ग्रह त्याच्या मातृताऱ्याभोवती फिरतो, त्याबाबतचे संशोधनही महत्त्वाचे राहील. हे संशोधन द ॲस्ट्रॉनॉमिकल जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहे.**





## उच्च न्यायालयाचा आदेश; आर्थिकस्थिती खालावल्याने पैसे भरण्यास विलंब

# हिमाचल भवनची मालमत्ता जप्तीचे आदेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**शिमला :** हिमाचल उच्च न्यायालयाने दिल्लीस्थित राज्य सरकारच्या हिमाचल भवनची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायाधीश अजय मोहन गोयल यांच्या न्यायालयाने सेली कंपनीला ६४ कोटी रुपयांचा अग्रिम प्रीमियम (अॅडव्हान्स रक्कम) न भरल्याप्रकरणी हा आदेश दिला आहे. इतकेच नाही, तर न्यायालयाने कंपनीला अपफ्रंट प्रीमियमवर ७ टक्के व्याज देण्यास सांगितले आहे.




हे व्याज अशा अधिकाऱ्यांकडून आकारले जाईल, ज्यांच्या निष्काळजीपणामुळे १३ जानेवारी २०२३ च्या सिंगल बेंचच्या आदेशानंतरही कंपनीला आगाऊ प्रीमियम अदा केला गेला नाही. न्यायालयाने आता ऊर्जा सचिवांना १५ दिवसांत आरोपी अधिकाऱ्यांची ओळख पटवण्याचे निर्देश दिले आहेत. अशा अधिकाऱ्यांची नावे पुढील सुनावणीत न्यायालयाला सांगावी लागणार आहेत. आरोपी अधिकाऱ्यांकडून व्याजाची रक्कम वसूल करून कंपनीला दिली जाईल. पुढील सुनावणीत याबाबत स्वतंत्र आदेश जारी करण्यात येणार आहेत. आता या प्रकरणाची सुनावणी सहा डिसेंबरला होणार आहे.

### सामान्यांचे निवासस्थान जप्त

● हिमाचल सरकारने दिल्लीत सुमारे ३२ खोल्यांची इमारत बांधली आहे. जिथे राज्याच्या नेत्यांशिवाय नोकरशहा, त्यांचे नातेवाइक आणि कधी कधी सामान्य जनताही मुक्कामी असते. ही मालमत्ता कंपनीला देण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत.

मुख्यमंत्री म्हणाले, की लवादाचे अनेक निर्णय चिंताजनक आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. यावर मुख्यमंत्री सुखविंदर सखू म्हणाले, की उच्च न्यायालयाचा आदेश अद्याप वाचलेला नाही. अपफ्रंट प्रीमियम ऊर्जा धोरणांतर्गत आहे. आम्ही राखीव किंमत ठेवली होती. त्यावर कंपनीने लवादाकडून निर्णय घेतला नाही. असे अनेक निर्णय लवादातूनही येत आहेत, जे चिंताजनक आहेत. २००९ मध्ये राज्य सरकारने लाहौल स्पिती येथील सेली कंपनीला ३२० मेगावॉटचा वीज प्रकल्प दिला होता. त्या वेळी हा प्रकल्प उभारण्यासाठी सरकारने रस्तेबांधणीचे काम बॉर्डर रोड सिक्युरिटीला (बीआरओ) दिले.

करारानुसार, कंपनीला प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करता यावे, यासाठी सरकारने कंपनीला मूलभूत सुविधा पुरवायच्या होत्या; मात्र कंपनीला शासनाकडून सुविधा देण्यात आल्या नाहीत. मूलभूत सुविधांअभावी हा प्रकल्प बंद करून सरकारला परत द्यावा लागला. यावर सरकारने कंपनीचा अग्रिम प्रीमियम जप्त केला. यानंतर कंपनीने २०१७ मध्ये उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. मूलभूत सुविधांअभावी हा प्रकल्प सरकारला परत देण्यात आल्याचे कंपनीने न्यायालयाला सांगितले. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने सरकारला सेली कंपनीला ६४ कोटी रुपये अग्रिम प्रीमियम परत करण्याचे आदेश दिले होते.

# हुडहुडी भरणार; उत्तर भारतात थंडीसह दाट धुक्याचा इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** देशात थंडी आणि धुक्याचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. हवामान खात्याने मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश, दिल्ली, हरियाणा आणि बिहारमध्ये दाट धुक्याचा इशारा जारी केला आहे.



थंडीचा सर्वाधिक परिणाम राजस्थानमध्ये दिसून येत आहे. फतेहपूर, सीकरमध्ये मंगळवारी किमान तापमान ६.५ अंश सेल्सिअसवर पोहोचले. भरतपूरमध्ये धुक्यामुळे दृश्यमानता ५० मीटरपेक्षा कमी राहिली; मात्र देशातील सर्वात कमी दृश्यमानता (शून्य मीटर) आग्रा येथे नोंदवण्यात आली. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार येत्या काही दिवसांत येथे धुके कायम राहणार आहे. दुसरीकडे, मध्य प्रदेशातही भोपाळ, ग्वाल्हेर, भिंड, मुरैना आणि दतियामध्ये दाट धुके दिसले. त्यामुळे दृश्यमानता खूपच कमी झाली. हवामान खात्याने म्हटले आहे, की बर्फवृष्टीमुळे मध्य प्रदेशात थंडी वाढली आहे.

श्रीनगर, जम्मू-काश्मीरमध्ये बर्फवृष्टी सुरूच आहे. सोनमर्गमध्ये सोमवारी सायंकाळपासून सुरू झालेली बर्फवृष्टी मंगळवारी सकाळीही सुरूच होती. त्यामुळे संपूर्ण उत्तर भारतात तापमानात घट नोंदवण्यात आली. फतेहपूरमध्ये मंगळवारी सकाळी किमान तापमान ६.५ अंश होते. सोमवारी येथे ७.५ अंश किमान तापमानाची नोंद झाली.

## शेअर बाजार ९० हजारांपर्यंत जाणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ग्लोबल ब्रोकरेज फर्म 'एचएसबीसी' ने भारताबाबतच्या रणनीतीवर नवीन नोट जारी करताना ओव्हरवेट आउटलुकसह सकारात्मक भूमिका कायम ठेवली आहे. अहवालानुसार, २०२५ च्या अखेरीस सेन्सेक्स ९० हजार ५२० पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. त्यामुळे सध्याच्या पातळीपेक्षा सुमारे १५ टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते.

'एचएसबीसी'ने यापूर्वी १,००,०८० हे लक्ष्य ठेवले होते. भारताचा आर्थिक विकास जरी थोडा मंदावला असला,तरी तो अजूनही मजबूत स्थितीत आहे. तथापि, इक्विटी मार्केटमध्ये काही आव्हाने आणि जोखीम कायम आहेत. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असूनही, भारतीय बाजारपेठेबाबत काही धोके आहेत.

## केरळमध्ये ऑनलाईन कोर्ट सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**तिरूअनंतपूरम :** केरळमधील कोल्लममध्ये देशातील पहिले २४ तास चालणारे ऑनलाइन कोर्ट सुरू झाले आहे. उद्या (ता. २०) पासून या न्यायालयात खटल्यांची सुनावणी होणार आहे. सेटलमेंट कायद्यांतर्गत चेक प्रकरणांचीही न्यायालयात सुनावणी होणार आहे. या न्यायालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे २४ तास सुनावणी होणार आहे.

न्यायालयात एक दंडाधिकारी आणि तीन कर्मचारी असतील. न्यायालयात कोठूनही ऑनलाइन केसेस दाखल करता येतात. न्यायालयाच्या संकेतस्थळावर विहित फॉर्म भरून खटला ऑनलाइन भरावा लागेल. सामान्य न्यायालयात होणाऱ्या न्यायालयीन इमारतीमध्ये कोणतेही कामकाज होणार नाही. केस दाखल करणाऱ्या व्यक्तीला किंवा वकिलांना वैयक्तिकरित्या न्यायालयात हजर राहण्याची आवश्यकता नाही. युक्तिवाद, सुनावणी आणि खटल्याचा निकाल यासह संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन होईल. पोलिस ठाण्यांना ऑनलाइनच पत्रे पाठवली जातील. आरोपी आणि गुन्हा दाखल करणारे लोक या दोघांना फक्त ऑनलाइन अर्ज भरावे लागतील.

ऑनलाइन अपलोड केलेल्या कागदपत्रांचा वापर करून जामीन मिळू शकतो. कोर्ट फी ई-पेमेंटद्वारे भरावी लागेल. येथे खटला दाखल करणारे आणि वकील यांना न्यायालयीन कामकाजात थेट सहभागी होण्यासाठी एक प्रक्रिया तयार करण्यात आली आहे. या डिजिटल कोर्टाचे कामकाज पाहून आणखी जिल्ह्यांमध्येही अशी न्यायालये सुरू करण्याची योजना आहे.

## » Selected

## विमानात अडकले प्रवासी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पॅरिसहून नवी दिल्लीला येणाऱ्या 'एअर इंडिया'च्या विमानातील प्रवाशांना दाट धुक्यामुळे जयपूरला वळवण्यात आले होते. त्यांना जयपूर विमानतळावर अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. सुरुवातीला विमान उतरल्यानंतर ते पाच तास विमानतळावर उभ्या असलेल्या विमानात अडकले होते, असे सांगण्यात आले. नंतर, जेव्हा ते विमानातून बाहेर पडले, तेव्हा त्यांच्यासाठी स्वतंत्र उड्डाणाची व्यवस्था करण्याऐवजी एअर इंडियाने प्रवाशांना बसने नवी दिल्लीपर्यंतचे अंतर प्रवास करण्याचा पर्याय दिला.

## बिहारमध्ये सापडली काडतुसे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भागलपूर :** बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील मधुसूदनपूर परिसरात सोमवारी एका गुरांच्या चाऱ्यातून बॉम्बसदृश वस्तू, सात काडतुसे आणि चार लहान धातूचे बॉक्स सापडले. त्यानंतर लोकांमध्ये घबराट पसरली; मात्र नंतर जप्त केलेले साहित्य स्फोटक नसल्याचे पोलिसांना समजले. या संशयास्पद वस्तू गोठ्यात ठेवणाऱ्या व्यक्तीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष तपास पथक तयार केले आहे. पोलिसांनी सांगितले, की सूचना मिळताच बॉम्ब निकामी पथकासह पोलिस गोठ्यात पोहोचले आणि एक सुतळी बॉम्बसदृश वस्तू, सात काडतुसे आणि टिनपासून बनवलेले चार छोटे बॉक्स जप्त केले.

## सर्वोच्च न्यायालय, अलाहाबाद उच्च न्यायालय बॉम्बने उडवण्याची धमकी

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालय, प्रयागराज रेल्वे स्थानक, अलाहाबाद उच्च न्यायालयाला बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्ष आशुतोष पांडे आणि जन्मभूमी-शाही ईदगाह प्रकरणी खटला दाखल करणाऱ्या व्यक्तीच्या व्हॉट्सअॅपवर धमकीचा संदेश आला आहे. मंगळवारी, मथुरा श्रीकृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयातही सुनावणी झाली. त्यापूर्वी सोमवारी रात्री उशीरा हा धमकीचा संदेश आला. आशुतोष पांडे यांनी दावा केला आहे की, हा धमकीचा संदेश पाकिस्तानातून आला आहे. सोमवारी, रात्री दीडच्या दरम्यान व्हॉट्सअॅपवर पाकिस्तानी नंबरवरून ६ धमकीचे संदेश आले असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर २.३६ वाजता व्हॉट्सअॅप कॉलद्वारे धमकी देण्यात आली. श्रीकृष्ण जन्मभूमी शाही ईदगाह प्रकरणात आशुतोष पक्षकार आहेत. ते श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती निर्माण ट्रस्टचे अध्यक्षही आहेत.

सहा धमकीचे व्हॉईस संदेश प्राप्त झाले. त्यात म्हटले होते – उच्च न्यायालयाच काय, आम्ही तुमचे सर्वोच्च न्यायालयही उडवून देऊ. तुमच्यात ताकद नाही. १९ नोव्हेंबरला सांगू आणि बोंबाबोंब करू. हायकोर्टात तुमची बोंब होईल. मथुरा, दिल्ली आणि भारतातील सर्व मोठी मंदिरे उडवून देतील.

# मोदींच्या दौऱ्यात सामरिक भागीदारीवर भर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**रिओ दी जानेरो :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-२० शिखर परिषदेच्या प्रसंगी इटली, इंडोनेशिया, नॉर्वे, पोर्तुगाल, इजिप्त आणि दक्षिण कोरिया या देशांच्या नेत्यांची भेट घेतली आणि संबंध सुधारण्यासाठी आणि मजबूत करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. मोदी यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी उपव्यवस्थापकीय संचालक गीता गोपीनाथ आणि युरोपीयन महासंघ अध्यक्ष उर्सुला वॉन डर लेयन यांचीही भेट घेतली.

मोदी यांनी सोमवारी त्यांचे इटालियन समकक्ष जॉर्जिया मेलोनी यांची भेट घेतली आणि सुरक्षा, व्यापार आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संबंध अधिक दृढ करण्याच्या मार्गांवर चर्चा केली. मोदी यांनी 'एक्स' वरील पोस्टमध्ये म्हटले आहे, की आमच्या चर्चेत संरक्षण, सुरक्षा, व्यापार आणि तंत्रज्ञान या क्षेत्रातील संबंध दृढ करण्यावर भर होता. आम्ही संस्कृती, शिक्षण आणि अशा इतर क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्याबाबत बोललो. भारत-इटली मैत्री ग्रह सुधारण्यासाठी मोठे योगदान देऊ शकते.

### भारत-नॉर्वेचे संबंध दृढ

● या परिषदेदरम्यान मोदी यांनी नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोरी यांचीही भेट घेतली. आमच्या आर्क्टिक धोरणामुळे भारत-नॉर्वे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ झाले आहेत. दोन्ही देशांमधील सहकार्य कसे आहे याबद्दल आम्ही बोललो. द्विपक्षीय संबंध कसे सुधारले जाऊ शकतात, विशेषत: अक्षय ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि महासागर आधारित अर्थव्यवस्था यावर चर्चा केली, असे मोदी यांनी सांगितले.

## भारतीय मच्छीमारांची सुटका

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**अहमदाबाद :** सीमा सुरक्षा दलाने पाकिस्तानच्या मेरीटाइम बोर्डाच्या तावडीतून सात मच्छीमारांची सुटका केली.

# गुजरातमध्ये भीषण अपघात, सहा ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**भरूच :** गुजरातमधील भरूच जिल्ह्यात सोमवारी रात्री एक भीषण अपघात झाला. त्यात जणांना आपला जीव गमवावा लागला. शुक्लतीर्थ जत्रेवरून परतणाऱ्या यात्रेकरूंच्या इको कारची जंबुसर-आमोद रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला धडक बसल्याने हा अपघात झाला. कारमध्ये दोन महिला आणि दोन लहान मुलांसह एकूण सहा जण होते. कारची धडक एवढी भीषण होती की, कारचे छत उडून गेले. बचाव पथकाने अपघातस्थळी पोहोचून मोठ्या प्रयत्नानंतर मृतदेह बाहेर काढले.

भरूचमधील जंबुसर-आमोद रोडवर झालेल्या अपघातात सपनाबेन जयदेव गोहिल, जयदेव गोविंदभाई गोहिल, कीर्तिकाबेन अर्जुनसिंग गोहिल, हंसाबेन अरविंद जाधव, संध्याबेन अरविंद जाधव आणि विवेक गणपत परमार यांचा समावेश आहे. हे सर्व लोक जंबुसरमधील वेडच आणि पंचकडा गावातील रहिवासी होते. अपघात झाला त्या वेळी हे सर्व जण शुक्लतीर्थ येथे सुरू असलेल्या जत्रेला भेट देण्यासाठी गेले होते आणि तेथून परतत असताना हा अपघात झाला. ईको कार उभ्या असलेल्या ट्रकला धडकली. सोमवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. ही धडक एवढी जोरदार होती की कारचे पूर्ण नुकसान झाले असून त्यातील लोक चांगलेच अडकले आहेत.

# गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईच्या भावाला अटक

**कॅलिफोर्निया :** गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा भावाला म्हणजेच अनमोल बिश्नोईला पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीप्रमाणे दोन आठवड्यांपूर्वीच गँगस्टर अनमोल बिश्नोईविरोधात अजामीनपात्र वारंट जारी करण्यात आलं होतं. त्यानंतर त्याला आता अटक करण्यात आली आहे. अनमोल बिश्नईला अमेरिकेच्या कॅलीफोर्नियामधून अटक करण्यात आली आहे.

सुत्रांकडून मिळत असलेल्या माहितीप्रमाणे आता अमेरिकन सरकार अनमोल बिश्नोईला भारताच्या स्वाधीन करणार आहे. प्रत्यार्पणाच्या हालचालींना वेग आला आहे. भारत सरकारकडून अनमोल बिश्नोईला भारतात आणण्याचा प्रयत्न सुरू आहे, अनमोल बिश्नोईच्या अटकेनंतर आता अनेक मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे.


अभिनेता सलमान खानच्या घराबाहेर गोळीबार करण्यात आला होता, या प्रकरणात अनमोल बिश्नोई वॉन्टेड आहे. मुंबई पोलिसांकडून त्याचा समावेश हा मोस्ट वॉन्टेड आरोपींच्या यादीमध्ये करण्यात आला आहे. त्याचा शोध सुरू असतानाच त्याला अमेरिकेतून अटक करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.दोन आठवड्यांपूर्वीच गँगस्टर अनमोल बिश्नोईविरोधात अजामीनपात्र वारंट जारी करण्यात आलं होतं. त्यानंतर त्याला आता अटक करण्यात आली आहे.

## मुख्य मंदिरापाशी जाण्यासाठी लागणार कमी वेळ

# वैष्णोदेवी यात्रेचे दर्शन होणार सोपे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जम्मू :** 'माता वैष्णोदेवी श्राइन बोर्ड'ने यात्रेकरूंचा प्रवास सोयीस्कर आणि जलद करण्यासाठी रोपवे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. 'सीईओ'अंशुल गर्ग म्हणाले, की रोपवे प्रकल्प एक गेम चेंजर असेल. ज्यांना मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी १३ किलोमीटरची चढण चढणे आव्हानात्मक वाटते. त्यांना रोप वे झाल्यामुळे दर्शन घेणे सहजशक्य होणार आहे.



ते म्हणाले की, गेल्या वर्षी माता वैष्णोदेवी यात्रेने ९५ लाखांहून अधिक भाविकांचा विक्रम केला. या प्रकल्पाची अनेक वर्षांपासून चर्चा सुरू होती आणि यात्रेकरूंना चांगल्या सुविधा देतानाच पुढे जाण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे. वृद्ध यात्रेकरूंना आणि जे शारीरिक कमतरतेमुळे किंवा हेलिकॉप्टर सेवेच्या मर्यादित क्षमतेमुळे कठीण प्रवास पूर्ण करू शकत नाहीत, त्यांना 'रोप वे' चा फायदा होईल. शिवाय, प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान स्थानिक भागधारकांच्या चिंतांचाही विचार केला जाईल, यावर बोर्डाने जोर दिला. निर्णय निश्चित झाल्यानंतर लवकरच मैदानाचे काम सुरू करण्याचे बोर्डाचे उद्दिष्ट आहे.

अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, 'रोप वे' तारकोट मार्गाला मुख्य तीर्थक्षेत्र इमारतीशी जोडेल.

● 'रोप-वे' ने दररोज हजारो भाविक जा ये करू शकतात. त्यामुळे पारंपारिक पदपथावरील गर्दी लक्षणीयरीत्या कमी होईल. तासाभराच्या प्रवासाच्या तुलनेत हा प्रवास काही मिनिटात होणार आहे.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे बाबत विद्यमान मालक ताराबाई किसन जाधव, रा. पानोली, ता. पारनेर, जि. अ.नगर यांचे व आमचे अशिल यांचे दरम्यान खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहाराबाबत बोलणी नक्की केली आहे. सदर मिळकतीचे विक्री व्यवहाराकामी विद्यमान मालक यांचे मालकी हक्क, ताबेवहिवाटीबाबत कोणाचाही, कसल्याही प्रकारचे हक्क, गहाणदान, नजरगहाण इ. हितसंबंध, अधिकार असल्यास अशा व्यक्तींनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत मुळ कागदपत्रानिशी खालील पत्यावर समक्ष भेटून सर्व अस्सल कागदपत्रे दाखवून आमचे अशिलांची खात्री पटवून द्यावी व लेखी हरकत नोंदवून तशी आमची पोहोच घ्यावी अन्यथा मुदतीत तसे न केल्यास सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी, बोजारहित आहे असे समजून व तसेच कोणाचाही काही हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्याने तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही, कसलीही तक्रार अथवा हरकत चालणार नाही व तसेच परस्पर कोणत्याही वर्तमानपत्रात घेतलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. परिशिष्ट वर्णन तुकडी पुणे, पोटतुकडी ता. शिरूर मे. दुय्यम निबंधक साहेब, शिरूर यांचे यांचे कार्यक्षेत्रातील तालुका पंचायत समिती शिरूर यांचे स्थलसीमेतील, जिल्हा पुणे, जिल्हा परिषद पुणे, गाव मौजे सरदवाडी (शिरूर ग्रामीण) येथील गट नं. १७१४/२ व १७१६ या दोन्ही गटातील विद्यमान मालक ताराबाई किसन जाधव यांचा अविभाज्य हिस्स्याचे संपूर्ण क्षेत्र यांसी चतुःसिमा प्रत्यक्ष ताबे वहिवाटीत असलेले क्षेत्र

येणेप्रमाणे जाहिर नोटीसीतील मिळकत असे.
दिनांक १७/११/२०२४

सही/-
**अॅड. रितेश एन. फुले**
ऑफीस – पुष्पा हाईटस् बिल्डींग, बिबवेवाडी कॉर्नर,
पुणे-सातारा रोड, पुणे. पीन ४११०३७
मोबा. ९६५७२७६३३३

(शिक्का)



## जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख पुणे यांचे कोर्टात जाहीर नोटीस (नमुना एन. ३)

या नोटीसद्वारे ३) सुनिल जेकब इंगळे, ४) सुशील जेकब इंगळे, दोघे रा. सर्व्हे नं. १ वडगावशेरी पुणे ४११०१४, ५) अनिल भाऊसाहेब रासगे, ६) मिरा तुकाराम रासगे, ७) लक्ष्मी सुर्यकांत आदमाने, ८) कविता राम गडलींग, ९) सागर विजु जाधव, १०) गणेश विजू जाधव, ११) गिताबाई चंद्रकांत राजगुरु, रा. माळवाडी, वडगावशेरी, पुणे ४११०१४ यांना कळविणेत येते की, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, पुणेयाना कळविण्यात येते की, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे या कार्यालयात श्री./सौ. जेकब बेंजमिन इंगळे (मयत तर्फे वारस) सुधीर जेकब इंगळे (मयत तर्फे वारस) १अ) श्रीमती मंजुषा सुधीर इंगळे व इतर यांनी आपणाविरुध्द मौजे वडगावशेरी ता. हवेली जि.पुणे येथील सि.स.नं/स.नं/ग.नं. १ या मिळकती बाबत दि. १६/०७/२०२४ रोजी फेरतपासणीसाठी अर्ज / अपिल अर्ज ७३८०/२०२४ दाखल केले आहे. त्या बाबतची आम्ही आपल्याला नोटीस काढली होती, मात्र आपण सदर सुनावणीस सतत गैरहजर असलेने / पत्ता व्यवस्थित सापडत नसलेने आपणांस या नोटीसीने कळविणेत येते की, अपिल नं. ७३८०/२४ मध्ये सुनावणीची पुढील तारीख दि २६/११/२०२४ वेळ ११.३० वा. नेमणेत आलेली आहे. तरी ३) सुनिल जेकब इंगळे, ४) सुशील जेकब इंगळे, दोघे रा. सर्व्हे नं. १ वडगावशेरी पुणे ४११०१४, ५) अनिल भाऊसाहेब रासगे, ६) मिरा तुकाराम रासगे, ७) लक्ष्मी सुर्यकांत आदमाने, ८) कविता राम गडलींग, ९) सागर विजु जाधव, १०) गणेश विजू जाधव, ११) गिताबाई चंद्रकांत राजगुरु, रा. माळवाडी, वडगावशेरी, पुणे ४११०१४ यांना कळविणेत येते की, जिल्हा अधिक्षक भुमि अभिलेख, पुणे या कार्यालयात यांनी अथवा त्यांचे हितसबंधितांनी सदर सुनावणी तारखेस जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, पुणे (बदामी चौक, बंगला नंबर १ येरवडा पुणे ०६) यांचे कार्यालयात हजर रहावे अन्यथा आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणीची कार्यवाही करणेत येईल याची नोंद घ्यावी.

**स्थळ :** पुणे
**दिनांक :** २०/११/२०२४/९१७८७

(शिक्का)

सही/-
**सुर्यकांत मोरे**
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख पुणे

उपरोक्त सुनावणीच्या अनुषगाने जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, येरवडा लोहगाव रोड येरवडा पोस्ट ऑफिसच्या पाठीमागे बंगला नं. १, येरवडा पुणे ४११००६ दुरध्वनी क्रमांक ०२०/२६६८४६५८ मेल dslr.pu-mh@gov.in यांच्याशी संपर्क व पत्र व्यवहार करावा



## CHANGE OF NAME

I Manisha Nitesh Bodke at Dhayari Pune 411041 I have changed my daughter's name from Nehal Santosh Dukare to Nehal Nitesh Bodke vide Maharashtra Gazette No. P2297934..

Notary Stamp



'राफा मला माहित आहे, तू सध्या तुझी कारकिर्दीचा शेवट करण्यावर लक्ष केंद्रीत केलेलं आहेस. जेव्हा सर्व संपेल, तेव्हा आपण बोलूच. तुला इतकंच सांगायचंय की तुझा हा मित्र तुला नेहमीच चिअर करत राहिल आणि यापुढेही तू जे करशील, त्यासाठीही तुला चिअर करेल"

— रॉजर फेडरर राफेल नादाल यास पत्राद्वारे

सुनील गावस्कर हे आयपीएल रिटेन्शन व आगामी मेगा ऑक्शनवर बोलत आहेत. माझ्या रिटेन्शनचा आणि पैशांचा काही संबंध नव्हता, ते मी ठामपणे सांगू शकतो. "

— ऋषभ पंत क्रिकेटपटू



## माजी कर्णधार सुनील गावसकर यांचा विश्वास

# विराट धावांचा भुकेला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** न्यूझीलंडविरुद्धच्या अपयशानंतर विराट कोहली सर्वोत्तम कामगिरी करण्यासाठी 'भुकेला' आहे, तसेच ऑस्ट्रेलियात नेहमीच त्याच्याकडून उत्तम कामगिरी झालेली आहे. त्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढेल, असे मत माजी विक्रमवीर फलंदाज सुनील गावसकर यांनी व्यक्त केले.

केवळ न्यूझीलंडविरुद्धच नव्हे तर विराट कोहलीला गेल्या काही महिन्यांत तिन्ही प्रकारात फार चांगले यश मिळवता आलेले नाही. गेल्या ६० कसोटी डावांत त्याला केवळ दोन शतके आणि ११ अर्धशतकेच करता आलेली आहेत.

यंदाचे वर्ष संपत आलेले असताना त्याची यंदाची सरासरी २२.७२ (सहा कसोटींत मिळून) एवढी घसरली आहे. न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात झालेल्या तीन कसोटीत मिळून विराटला केवळ ९३ धावाच करता आलेल्या आहेत.

न्यूझीलंडविरुद्ध धावा करता आल्या नसल्यामुळे विराट धावांचा भुकेला झाला आहे. त्यामुळे ऑस्ट्रेलियात तो दुपटीने त्याची भरपाई करेल, असा विश्वास गावसकर यांनी स्टार स्पोर्ट्सशी बोलताना व्यक्त केला.

ॲडलेड कसोटीत दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा डाव ३६ धावांत संपला होता. त्या कसोटीत पहिल्या डावात विराटने ७० धावांची खेळी केली होती. त्यात तो धावचीत झाला होता, ही आठवण गावसकर यांनी काढली.

ऑस्ट्रेलियात विराटची बॅट हमखास तळपते. त्याने आतापर्यंत ऑस्ट्रेलियाचे चार दौरे केले आहेत. त्यात त्याची सरासरी ५४.०८ अशी राहिलेली आहे. ही आकडेवारीच यंदाच्या दौऱ्यात विराट कोहलीला बळ देईल, असे गावसर म्हणतात.

# ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी महिला संघाची घोषणा

**ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय संघ**

● हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना, प्रिया पुनिया, जेमिमाह रॉड्रिग्ज, हरलीन देओल, यास्तिका भाटिया, तेजल हसबनीस, दीप्ती शर्मा, मिनू मणी, प्रिया मिश्रा, राधा यादव, तीतस साधू, अरुंधती रेड्डी, रेणुका ठाकूर आणि सायमा ठाकूर.

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महिला निवड समितीने ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी भारतीय महिला संघाची घोषणा केली आहे. तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत खराब फॉर्ममुळे सलामीवीर शेफाली वर्माला संघातून वगळण्यात आले आहे. भारतीय महिला संघाचा हा दौरा 5 डिसेंबरपासून सुरू होणार आहे.

जवळपास वर्षभरानंतर हरलीन देओलचे वनडे संघात पुनरागमन झाले आहे. बोर्डाच्या परीक्षेमुळे न्यूझीलंडविरुद्ध घरची मालिका न खेळलेल्या रिचा घोषलाही संघात आणण्यात आले आहे. 16 सदस्यीय संघात प्रिया पुनिया, लेगस्पिनर मिन्नू मणी आणि वेगवान गोलंदाज तीतस साधू यांच्या नावांचा समावेश आहे. संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करणार आहे.

**शेफाली वर्माचे नाव संघात नाही**

सलामीवीर शेफाली वर्माची ऑस्ट्रेलियन दौऱ्यासाठी संघात निवड झालेली नाही. मागील मालिकेतील त्याची खराब कामगिरी हे त्याचे कारण आहे. शेफालीने न्यूझीलंडविरुद्धच्या 3 वनडेत 56 धावा केल्या होत्या. याशिवाय, ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी, भारताने न्यूझीलंड मालिकेसाठी जवळपास तोच संघ निवडला आहे जो न्यूझीलंडविरुद्ध घरच्या वनडे मालिकेत खेळताना दिसला होता.

# सोलापूर स्टार इलेव्हनची रिक्रिएशनवर मात

## बाळकृष्ण काशीद सामनावीर



**पुणे :** विवेक अंची व कर्णधार बाळकृष्ण काशीद यांनी केलेल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर सोलापूर स्टार इलेव्हन संघाने रिक्रिएशन क्लब संघावर ५ गडी राखून मात करताना, इकोल स्पोर्ट्स फाउंडेशन यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इकोल टी-२० करंडक स्पर्धेत आपली आगेकूच कायम राखली. शिंदे हायस्कुलच्या मैदानावर झालेल्या लढतीमध्ये प्रथम फलंदाजी करताना, रिक्रिएशन संघाने निर्धारित २० षटकांत ९ बाद १३८ धावांपर्यंत मजल मारली. अथर्व दातारने २१ चेंडूत ३७ धावांची खेळी करताना संघाला १०० धावांचा टप्पा ओलांडून दिला. त्याला सौरभ दोडकेने २७, रुद्रज घोसाळेने १७ तर शुभम मानेने १६ धावा करताना सुरेख साथ दिली. बाळकृष्ण काशीदने १८ धावांच्या मोबदल्यात ४ बळी टिपले. पुष्कराज खराडेने ३ तर जय पांढरेने २ गडी बाद केले.

सोलापूर संघाने १९ षटकांत ५ बाद १४२ धावा करताना विजय साकारला. विवेक अंचीने एक बाजू लावून धरताना ५४ चेंडूत ८ चौकार व १ षटकार मारताना ६५ धावांची खेळी केली. त्याला अक्षय पंचार्यने १६, वैष्णव जावळेने १८ व निरंजन कदमने १९ धावा करताना संघाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. साहिल कडने २ तर सौरभ दोडके, रुद्रज घोसाळे व आदिनाथ गायकवाड यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला.

## 'ग्रेसिया करंडक'

# अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमी, मिझुकी क्लब संघांची विजयी सलामी !!

**पुणे :**ग्रेसिया क्रिकेट ॲकॅडमी तर्फे आयोजित 'ग्रेसिया करंडक' २०२४ खुली आंतर-क्लब टेव्न्टी-२० क्रिकेट स्पर्धेत अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमी आणि मिझुकी क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. मुंढवा येथील लिजंड्स स्पोर्ट्स क्लब येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत १९ वर्षाखालील गटामध्ये कार्तिक जगताप याने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीचा ३३ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करताना अगस्त्य क्रिकेट ॲकॅडमीने १७२ धावांचे लक्ष्य उभे केले. यामध्ये ऋत्विक रडे (४१ धावा), कार्तिक जगताप (३९ धावा) आणि आधार सावंत (३७ धावा) यांनी संघाचा डाव उभा केला. या लक्ष्याचा पाठलाग करताना लिजंड्स क्रिकेट ॲकॅडमीचा डाव १३९ धावांवर मर्यादित राहीला. गोलंदाजीमध्ये अगस्त्य संघाच्या विराज नांगरे, आधार सावंत, ज्ञानल ठिगळे आणि कार्तिक जगताप यांनी प्रत्येकी दोन गडी बाद करून संघाला विजय मिळवून दिला.







खुल्या गटाच्या सामन्यामध्ये सुरज कारडीले याने केलेल्या तुफान फटकेबाजीमुळे मिझुकी क्लबने स्केलअप संघाचा ८ गडी राखून सहज पराभव केला. स्केलअप क संघाने दिलेल्या १३७ धावांचा लक्ष्याचा पाठलाग मिझुकी क्लबने केवळ ८ षटकात व २ गडी गमावून पूर्ण केला. यामध्ये सुरज कारडीले हिने २२ चेंडूत ८ चौकार आणि ९ षटकारांसह नाबाद ८८ धावांची खेळी केली आणि संघाला एकहाती विजय मिळवून दिला.

## डॉ.प्रमोद मुळे स्मृती करंडक प्रौढ टेबल टेनिस स्पर्धा

# नीता कुलकर्णी, मनिषा बोडस, सतीश कुलकर्णी, सुबोध देशपांडे विजेते

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लब आयोजित डॉ.प्रमोद मुळे स्मृती करंडक प्रौढ राज्यमानांकन टेबल टेनिस स्पर्धेत नीता कुलकर्णी, मनिषा बोडस, सतीश कुलकर्णी, सुबोध देशपांडे यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. पुणे जिल्हा टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने पीवायसी क्लबच्या कम्युनिटी हॉलमध्ये आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत 59 वर्षांवरील महिला गटात अंतिम फेरीत मुंबई शहरच्या नीता कुलकर्णीने नागपूरच्या रोहिणी ऐलवरचा 11-8, 7-11, 11-2, 11-2 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. 69 वर्षांवरील व 74



महिला वयोगटात अंतिम फेरीत पुण्याच्या मनिषा बोडसने वीणा जोशीचा 11-3, 11-6, 5-11, 9-11, 11-8 असा संघर्षपूर्ण पराभव करून विजेतेपदाला गवसणी घातली.

मुंबई शहरच्या सतीश कुलकर्णीने आपला शहर सहकारी चौथ्या मानांकित पिनाकिन संपचा 11-7, 8-11, 11-5, 7-11, 11-7



असा पराभव करून विजेतेपद पटकावले. 79 वर्षांवरील गटात अंतिम सामन्यात पुण्याच्या सुबोध देशपांडे याने नाशिकच्या सतीश शिरसाठचा 11-8, 9-11, 12-10, 11-5 असा पराभव करून विजेतेपद मिळविले.

स्पर्धेचे उद्घाटन पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष कुमार ताम्हाणे, टेबलटेनिस विभागाचे सचिव तन्मय आगाशे, विद्या मुळे, एमएसटीटीएचे राजीव बोडस, स्मिता बोडस, आशिष बोडस, मनिषा बोडस यांच्या हस्ते झाले.

# स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीने उद्घाटनाचा दिवस गाजवला !!

## 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत यशोवर्धन पुरी याने केलेल्या अष्टपैलु खेळीच्या जोरावर स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीने विजय क्रिकेट ॲकॅडमीचा ५ गडी राखून पराभव करून स्पर्धेच्या उद्घाटनाचा दिवस गाजवला.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट ॲकॅडमीच्या मैदानावर झालेल्या स्पर्धेच्या या सामन्यामध्ये पहिल्यांदा



फलंदाजी करताना विजय क्रिकेट ॲकॅडमीने ४६.५ षटकामध्ये २२१ धावा धावफलकावर लावल्या. डावाची बांधणी करताना वेदांत गोरे (४२ धावा) आणि आयुष म्हाळसकर (४० धावा) यांनी दुसऱ्या गड्यासाठी ९० चेंडूत ९५ धावांची भागिदारी केली. शिवम गोरे (नाबाद ४३ धावा) आणि प्रेम इघे (३२ धावा) यांनीही धावांचे योगदान देत २२१ धावांचे लक्ष्य उभे केले. गोलंदाजीमध्ये स्पार्क संघाच्या आदेश सोळंकी (३-२७), सोहम मोहीते (२-२२) आणि पार्थ पांडे (२-३४) यांनी चांगली कामगिरी केली.

स्पार्क स्पोर्टीव्ह क्रिकेट ॲकॅडमीने हे लक्ष्य ४८.१ षटकात व ५ गडी गमावून पूर्ण केले. यामध्ये ध्रुविल रैताठा याने १०३ चेंडूत ९ चौकारांसह ७४ धावांची खेळी केली. मधल्याफळीतील फलंदाज यशोवर्धन पुरी याने नाबाद ४५ धावा केल्या.

## ओम दळवी मेमोरियल टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड करंडक

# डेनिका फर्नांडो हिला दुहेरी मुकुट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ओम दळवी मेमोरियल ट्रस्ट यांच्या तर्फे आयोजित व एआयटीए यांच्या मान्यतेखाली होत असलेल्या चौदाव्या ओम दळवी मेमोरियल टी अँड टी इफ्रा लिमिटेड करंडक अखिल भारतीय मानांकन सुपर सिरीज(18 वर्षाखालील) टेनिस स्पर्धेत मुलींच्या गटात डेनिका फर्नांडो हीने एकेरी व दुहेरी या दोन्ही गटात विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट संपादन केला. तर, मुलांच्या गटात एकेरीत स्वराज ढमढेरे याने, दुहेरीत नील केळकर व अर्जुन किर्तने यांनी



विजेतेपद पटकावले.

महाराष्ट्र पोलिस(एमटी जिमखाना)टेनिस जिमखाना,परिहार चौक, औध येथे पार पडलेल्या स्पर्धेला टी अँड टी इफ्रा लिमिटेड यांचे प्रायोजकत्व लाभले असून सिनर्जी प्रॉपर्टीज, मायक्रो इव्ही, आयकॉन ग्रुप, ग्रीन स्पॅन एग्रिटेक यांनी सहप्रायोजित केले होते. या स्पर्धेत एकेरीत अंतिम फेरीत मुलांच्या गटात तिसऱ्या मानांकित स्वराज ढमढेरेने नीव कोठारीचा 7-5, 6-3 असा पराभव करून विजेतेपद पटकावले. स्वराज हा आबासाहेब गरवारे महाविद्यालयात वाणिज्य शाखेत अकरावी इयत्तेत शिकत असून डेक्कन जिमखाना क्लब येथे प्रशिक्षक संदीप किर्तने व रोहन भाटिया यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. स्वराजचे हे दुसरे विजेतेपद असून नुकत्याच मुंबई येथे 18 वर्षाखालील नॅशनल सिरीज स्पर्धेत विजेतेपद पटकावले होते. मुलींच्या गटात अंतिम फेरीत अव्वल मानांकित महाराष्ट्राच्या डेनिका फर्नांडोने दुसऱ्या मानांकित महाराष्ट्राच्या पार्थसारथी मुंढेचा 6-4, 6-3 असा पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला.

## मॅव्हेरिक्स आंतर क्लब क्रिकेट स्पर्धा

# मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाचा अंतिम फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी वाकड यांच्या वतीने आयोजित मॅव्हेरिक्स आंतर क्लब 11 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत ऋग्वेद निकम 47धावा व 4-3) याने केलेल्या उत्कृष्ट अष्टपैलू खेळीच्या जोरावर मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाने मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघाचा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

30वायसीए स्पार्क क्रिकेट



मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी रेड संघाने 20षटकात 8बाद 168 धावाचे आव्हान उभे केले. यात ऋग्वेद निकम 47, वंश अग्रवाल 21, अर्णव पाटेखेडे 19 यांनी धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. याच्या उत्तरात मॅव्हेरिक्स क्रिकेट अकादमी ब्लू संघ 14.3 षटकात सर्वबाद 107धावावर कोसळला.

# बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाची विजयी सलामी

**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 15 वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत अथर्व चौधरी(5-23)याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी अ संघाचा 6 गडी राखून पराभव विजयी सलामी दिली.. आंबेगाव येथील क्रिकेट मैदानावर आजपासून सुरू झालेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत प्रथम फलंदाजी करताना बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी अ संघाने 27.3षटकात सर्वबाद 173धावा केल्या. यात विवान शर्मा 62, धैर्य यादव 51, अभ्यंग देशमुख 11 यांनी धावा केल्या. बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाकडून अथर्व चौधरी(5-23), अस्मिता शिंदे(2-4), आर्यन सिंग(1-16)यांनी भेदक गोलंदाजी केली. हे आव्हान बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ब संघाने 25.4षटकात 4बाद 174धावा करून पूर्ण केले. यात रुद्रांश पांढरे 59, विक्रम चौहान 56, तनिष्क शिनगारे 13 यांनी धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.



# टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा : लॉ संघ विजेता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांच्या वाढदिवसानिमीत्त पुण्यातील टेंबेकर फार्म येथील क्रिकेट मैदानावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या आंतर विभागीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा पार पडल्या.



या स्पर्धेत बुधवारी झालेल्या लॉ संघ विरुद्ध फिजिओथेरपी संघात झालेल्या अंतिम सामन्यात लॉ संघाने तब्बल 10 फलंदाज राखुन बलाढ्य विजय मिळविला. यावेळी अजिंक्य जैन याला सामनावीर आणि सर्वोत्तम फलंदाज तसेच सर्वोत्तम गोलंदाज म्हणुन घोषित करण्यात आले. अजिंक्य जैन याच्या जबरदस्त कामगिरीच्या जोरावर लॉ संघाने अंतिम सामन्यावर वर्चस्व मिळविले. फिजिओथेरपी संघाने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना फिजिओथेरपी संघाने 8 षटकांत 10 फलंदाजांच्या मोबदल्यात 51 धावा केल्या. त्यामुळे 52 धावांचे आव्हान लॉ संघाला मिळाले. त्यानंतर लॉ संघाने हे आव्हान स्वीकारत जबरदस्त कामगिरीच्या जोरावर अवघ्या 3.4 षटकांत 55 धावा एकही फलंदाज न गमावता केल्या आणि हा सामना जिंकला. लॉ संघाकडून खेळताना सलामीवीर अजिंक्य जैन याने 11 चेंडूत 39 धावा केल्या.

## बालदिनानिमित्त डायमंड पार्क्स लोहगावतर्फे

# शालेय फुटबॉल स्पर्धा, 'चिल्ड्रेन्स स्पेशल विक'

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोहगाव येथील डायमंड पार्क्सच्या वतीने बालदिनाचे औचित्य साधून 'प्रायमरी स्कुल महाराष्ट्र लीग २०२४' या शालेय फुटबॉल स्पर्धेचे, तसेच 'चिल्ड्रेन्स स्पेशल वीक'चे आयोजन करण्यात आले होते. प्रायमरी स्कुल्स इंडिजिनीयस स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, अंजनेय साठे ग्रुपच्या सहकार्याने ही स्पर्धा झाली. १८ वर्षांखालील या लहान मुलांसाठी





खास आठवडा उपक्रम व स्पर्धेला मुलांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे ग्रामीण संघाने प्रथम, पुणे शहर संघाने द्वितीय, तर नाशिक व पिंपरी-चिंचवड संघाने संयुक्तपणे तिसरा क्रमांक पटकवला.

प्रायमरी स्कुल्स इंडिजिनीयस स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष आणि डायमंड पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक अर्जुन इंदुलकर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. प्रसंगी प्रायमरी स्कुल्स इंडिजिनीयस स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अंजनेय साठे, लीगचे आयोजन संचालक दीपक अरडे, प्रायमरी स्कुल्स इंडिजिनीयस स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सचिव डॉ. विल्सन अँड्रयूज आदी उपस्थित होते. नागपूर, परभणी, बुलढाणा, जळगाव, नाशिक आणि पुणे या जिल्ह्यातून एकूण ९ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेच्या समारोपावेळी राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंची उपस्थिती मुलांसाठी प्रेरणादायी ठरली.